म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : ...बा.वा....
दा. क्र. : २९६२

BVBK-0402962

बा.वा.
२९६२
३१।३।७८

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. २९६२ दिनांक ३१।३।७८
विषय बा. वा. पु.

# अक्षय शिदोरी

लेखिका

सौ. लीला दीक्षित

BVBK-0402962

मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

अक्षय शिदोरी

प्रकाशिका :
सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११०३०

© सौ. लीला दीक्षित

प्रकाशन क्रमांक ६१०
ISBN 81-85773-25-4

नवीन आवृत्ती :
१० सप्टेंबर १९९३

मुद्रक :
श्री. प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स
१०८६ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ :
श्री. रमेश भारताल

मूल्य :
रुपये पंधरा मात्र

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १) | अक्षय शिदोरी | ५ |
| २) | नवल नगरीतील नगारा | ११ |
| ३) | भागू आली घरा | २६ |
| ४) | नवरत्नांचा हार | ३४ |
| ५) | दुधाचा समुद्र | ४४ |
| ६) | पंचदीप | ५० |
| ७) | सूर पृथ्वीवर आले | ५७ |


—०—

# मनोगत

बालवाङ्मयात रंजनाबरोबर उद्बोधन हा अत्यंत आवश्यक भाग आहे अशी माझी दृष्टी आहे. लहान मुलांची मने फुलपाखरासारखी विविध फुलांतील मध चाखणारी. त्यांच्यापुढे सद्गुणांचे ताटवे सदैव फुललेले ठेवले की ही संस्कारक्षम मने हा गुणगंध निश्चितच घेतात. तीच त्यांच्या पुढील जीवनाची ' अक्षय शिदोरी ' या संग्रहातील प्रत्येक कथा गुणसुमनांचा ताटवा आहे. किशोर वयातील मुलांसाठी या कथा मी प्रामुख्याने लिहिल्या आहेत. त्यांना त्या निश्चितच आवडतील असा विश्वास वाटतो.

सौ. लीला दीक्षित

२९६२ ३१
बा वा.

# अक्षय शिदोरी



आनंदपूर नावाचे ते राज्य. तेथे होता एक राजा. जगमित्रा त्याचे नाव. त्याची प्रजा सुखी होती. प्रजेवर राजाचे फार प्रेम— अगदी आपल्या मुलांप्रमाणे. प्रजेचेही राजावर फार प्रेम. शेजारी नांदत असलेली राज्येही या राजाची मित्रराष्ट्रे होती. तरीही या राजाचे सैन्य नेहमी सुसज्ज असे. राजा नेहमी हसून म्हणायचा— 'बलवान माणसाकडे कोणी वाकड्या नजरेने पाहत नाही. राष्ट्राचेही तसेच असते. सुसज्ज सैन्य ठेवण्यात प्रजेला निम्मे स्वास्थ्य मिळते.'

राज्यामध्ये धनधान्य भरपूर होते. शेतकरी खूप कष्ट करीत, मनापासून काळ्या आईची सेवा करीत. शेतामधे खूप धान्य पिके. योग्य तो शेतसारा धान्याच्या रूपाने शेतकरी राजाच्या कोठारात भरीत. त्यामुळे राजाचे धान्यकोठार कायम तुडुंब भरलेले. व्यापारीही उद्योगी होते. किती तरी वस्तूंचा ते देशोदेशी व्यापार करीत. जकातीच्या रूपाने वा कराच्या रूपाने खजिन्यामधे भरपूर पैसा येई. या राज्यात अनेक कारागीर व कलावंतही होते. ते गालिचे, मूर्ती, उंची रेशमी वस्त्रे, विविध शस्त्रे वगैरे अनेक सुंदर वस्तू तयार करीत. त्यामुळे येथील बाजारपेठा या एक भूषण होत्या. अनेक कलावंत, गवई, वजवय्ये, चित्रकार, कारागीर, कवी, शिल्पकार या राज्यामधे राजाश्रयामुळे आपल्या कलांची स्वस्थ मनाने उपासना करीत होते. धनधान्य विपुल, तसेच कला व विद्या यांना राजाश्रय त्यामुळे आनंदपूर हे खरोखरच आदर्श राज्य होते. प्रजा सुखी म्हणून राजाही सुखी, पण सुख म्हणजे काहीच काळजी वा चिंता नाही असा याचा अर्थ नव्हे हं. चांगले आहे ते सतत चांगले कसे राहील ही चिंता म्हणा किंवा काळजी म्हणा, या सुखात सतत घ्यावीच लागते, नाही का ?

या राजाला दोन मुलगे होते– विक्रम आणि विमल. आपल्यामागे हे दोन्ही मुलगे असेच कर्तबगार झाले पाहिजेत, प्रजादक्ष झाले पाहिजेत, हीच त्या राजाला सतत काळजी. या दोन्ही मुलांना राजाने उत्तम शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. आनंदपूरमधे तपस्वी योगंधरायण ऋषींचा आश्रम होता. त्यांच्या गुरुकुलामधे हे दोन्ही राजपुत्र वयाच्या सात-आठ वर्षापासून शिक्षणासाठी राहिले होते. राजपुत्रांना आवश्यक असलेले सर्व शिक्षण तपस्वी योगंधरायण स्वतः लक्ष घालून राजपुत्रांना देत होते. हेच राजपुत्र

उद्या राज्यकारभार करणार होते. त्यासाठी त्यांना शस्त्रविद्या, अस्त्रविद्या तसेच न्याय वगैरे सर्व गोष्टींचे शिक्षण सूक्ष्मतेने दिले जात होते. दोघेही राजकुमार हुषार होते, गुरूने दिलेली विद्या लक्षपूर्वक आत्मसात करीत होते.

अशीच बारा वर्षे झाली. दोघेही कुमार आता मोठे झाले होते. मोठा विक्रम वीस वर्षांचा तर धाकटा विमल अठरा वर्षांचा झाला. राजाने विचार केला, आणि एक दिवस महामंत्र्यांना बोलावणे धाडले. राजाज्ञेने महामंत्री आले. राजा म्हणाला–

'महामंत्री, कुमारांच्या शिक्षणाची बारा वर्षे पूर्ण झाली. एक तप संपले. ऋषिवर्यांनी सांगितल्याप्रमाणे कुमारांचे शिक्षण आता पूर्ण झाले असेल, आता दोन्ही कुमारांना परत बोलावून घ्यावे असे वाटते. माझ्या देखरेखीखाली थोडे दिवस प्रत्यक्ष राज्यकार-भार त्यांना पाहू दे. म्हणजे योग्य ते मार्गदर्शन करून लवकरच मी ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवणार आहे.'

महामंत्री म्हणाले–

'महाराज, दोघेही कुमार अजून लहान आहेत. या वयात एवढी जबाबदारी टाकायची म्हणजे–'

राजेसाहेब म्हणाले–

'महामंत्री, तुम्हाला आठवते ? ही राज्याची धुरा मी उचलली तेव्हा आपले वडील थोरल्या महाराजांना असेच म्हणाले होते. त्या वेळी थोरल्या महाराजांनी जे उत्तर आपल्या वडिलांना दिले तेच मी आज तुम्हाला देत आहे–

'तरुण वयात मोठी जबाबदारी पेलण्याचे सामर्थ्यच कर्तब-गारीचा कस लावून जाते. त्यातून कुमारांना योग्य मार्गदर्शन करायला सुरुवातीला आपण सर्व आहोतच ना ?'

महामंत्री काहीच बोलले नाहीत. मनात उमजले. कुमारांच्या कर्तबगारीवर महाराजांचा विश्वास त्यांना जाणवला.

महाराज पुढे म्हणाले–

' महामंत्री, ऋषिवर्यांना कळवा की आम्ही प्रत्यक्षच त्यांच्या भेटीला येत आहोत. '

दुसऱ्या दिवशी राजे जगमित्रा तपस्वी योगंधरायणाच्या आश्रमात आले. वडिलांना पाहून दोघाही कुमारांना खूप आनंद झाला. दोघा कुमारांनी वाकून वडिलांना नमस्कार केला. त्यांची पिळदार सतेज शरीरयष्टी, चेहऱ्यावरील आत्मविश्वासाचा भाव पाहून महाराज मनातून सुखावले. इतक्यात ऋषिवर्य योगंधरायण आले. महाराजांनी लवून नमस्कार केला. विद्येपुढे सत्ता नम्र होत होती. महाराजांनी ऋषिवर्यांना क्षेमकुशल विचारले व आपला मनोदय सांगितला.

ऋषिवर्य म्हणाले–

' राजा तुझे दोन्ही मुलगे आज बारा वर्षे माझ्याकडे अध्ययन करीत आहेत. दोघेही कुशाग्र बुद्धीचे आहेत. अस्त्रविद्या, शस्त्रविद्या, न्यायशास्त्र, नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, राज्यशास्त्र या साऱ्या शाखांत आवश्यक ते ज्ञान त्यांना मी दिले आहे, ' राजकुमार ' म्हणून आवश्यक ते ते सर्व त्यांना मी शिकवले आहे. तरीसुद्धा अजून एक वर्षाने या दोन्ही मुलांना परत राजधानीत तू न्यावेस असे मला वाटते. वर्षभरात, या मुलांना मी जे शिक्षण दिले आहे. त्या जीवनाच्या शिदोरीचा ते प्रत्यक्षात कसा उपयोग करतात तेच मला पाहायचे आहे. '

राजाने हसून या गोष्टीला संमती दिली व महामंत्री व राजे जगमित्रा परत राजधानीमध्ये परत आले.

तो दसऱ्याचा दिवस होता. दोन्ही कुमारांना गुरुजींनी जवळ बोलावले. त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत ते म्हणाले–

'बाळांनो! आज सीमोल्लंघनाचा दिवस आहे. आज या आश्रमाचीही सीमा तुम्हाला ओलांडायची आहे. व खऱ्या अर्थाने जगात प्रवेश करायचा आहे. आपल्या संस्कृतीला, धर्माला, कुला-शीलाला भूषण होईल असाच आचार व विचार तुम्ही ठेवाल याबद्दल माझी खात्री आहे. तुम्हाला दिलेल्या शिक्षणाचा योग्य उपयोग करा. आजपासून वर्षभरपर्यंत सगळीकडे प्रवास करा. अनुभव-धन मिळवा. बरोबर एक वर्षाने याच दिवशी दसऱ्याला आश्रमात परत या हं! पण प्रवास करायचा तो मात्र स्वतंत्रपणे दोघेही दोन दिशांना जा म्हणजे तुमच्या स्वतंत्र विचाराला व व बुद्धीला चालना मिळेल.'

ऋषिवर्यांना नमस्कार करून ते आश्रमातून बाहेर पडले.

वयाच्या सात-आठ वर्षांपर्यंत अत्यंत लाडात राजकुमार म्हणून त्यांचे दिवस गेले होते. पुढची बारा वर्षे या आश्रमात सवंगड्यांच्या सहवासात व प्रेमळ ऋषिवर्यांच्या छायेत गेली होती. स्वतंत्रपणे प्रवास खऱ्या अर्थाने आजच सुरू होत होता.

दोघेही एकमेकांच्या हातात हात घालून चालले होते. कुमार विमल म्हणाला–

'दादा, गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे आपण वेगळ्या दिशांनी प्रवास सुरू केला पाहिजे. मी पूर्वेकडे जायचे ठरवीत आहे तू कोणत्या दिशेला जाणार?'

विक्रम म्हणाला–

'विमल, तू पूर्वेकडे नको जाऊस तो सर्वच भाग जंगलमय आहे त्यात तुझा एकट्याचा कसा निभाव लागणार? गुरुजींनी बरोबर

योग्य ते सामान घेऊन निघा असे मांगूनही तू शस्त्रे बरोबर घेतली नाहीस. शौर्य हे राजाचे सामर्थ्य आहे. आपण राजपुत्र आहोत बाबा.'

विमल नुसताच हसला.

विक्रम पुढे म्हणाला–' विमल, तो सारा भाग जंगलमय वेळ-प्रसंग काय सांगू येतो ? हा माझा जंबिया ठेव पाहू तुझ्याकडं.'

असे म्हणत विक्रमने विमलच्या कमरेच्या शेल्यात जांबिया खोचून दिला.

विमल शांत होता. तो म्हणाला–

' दादा, मी पूर्वेकडेच जाणार आहे. जंगल असले म्हणून काय झाले ? मला नाही भीती वाटत आणि शौर्यपेक्षाही माझा माझ्या मनाच्या सामर्थ्यावर विश्वास आहे.'

शेवटी दोघांनी आपल्याला योग्य वाटेल त्याच दिशेने जावे असे ठरले. दोघे भाऊ एकमेकांना कडकडून भेटले. लहानपणापासून एकत्र वाढलेले, हसलेले, खेळलेले ते दोघे आजच पहिल्यांदा एकमेकांपासून दूर जात होते. विमल मनाचा हळवा होता. त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. त्याचे अश्रु शेल्याने पुसत विक्रम म्हणाला–

' विमल, पूस पाहू डोळे, वर्षभराचा तर प्रश्न आहे. मग आहोतच की आपण दोघे एकत्र, हं. हास पाहू !'

विमल म्हणाला–

' दादा मला तुझी काळजी वाटते.'

विक्रम खो खो हसू लागला, व म्हणाला–

' अरे, मी तुझा मोठा भाऊ. तू माझी काळजी करायची की मी तुझी ? चल, वेडा कुठला !'

विमल म्हणाला—

'दादा एक सांगू का ?'

'काय ?'

'तू रागावणार नाहीस ?'

'अरे विमू, मी तुझ्यावर कसा रागावेन ?'

'दादा, पण लहानांनी मोठ्यांना उपदेश करायचा नसतो ना ?'

'नुसती लहानांनी मोठ्यांची काळजी करायची, असंच ना ? अरे विमू, काय सांगायचे आहे तुला ? सांग, मोकळ्या मनाने सांगून टाक पाहू.'

'दादा, खरंच सांगू ?'

'अरे खरंच सांग, कसला उपदेश ? तुझं सारंच बाबा जगावेगळं, हं. सांग बाबा लवकर आता.'

'दादा, शौर्यावर फार विश्वास नको ठेवू. त्याने सारेच नाही जिंकता येत !'

विक्रम हसू लागला. म्हणाला—

'विमल, मनगट बळकट असेल तरच मनाची पर्वा केली जाते हेही तू लक्षात ठेव.'

दोघेही एकमेकांचा निरोप घेऊन दोन दिशेला गेले. विक्रम उत्तरेकडे गेला. लवकरच त्याने आपल्या राज्याची सीमा ओलांडली. आनंदपूरला लागूनच असलेल्या जयपूरमध्ये तो आला. जयपूरमध्ये त्याच दिवशी शस्त्रविद्येच्या स्पर्धा होत्या. विक्रमने मनात विचार केला. दैवानेच ही संधी आपल्यापुढे आणून ठेवली आहे. त्याने स्पर्धेमध्ये आपले नाव नोंदवले.

एकमेकांमागून एक होणाऱ्या शस्त्रविद्येमध्ये विक्रम नंबर पटकावीत होता. सर्व लोक कुतूहलाने या नवयुवकाकडे पाहत होते. आपापसात बोलत होते–

'कुणा राजघराण्यातील असावा. तोंडावर तेज तरी पहा किती ?'

'हो ना, शूर आणि तेजस्वी. कोण असावा हा नवयुवक ?' आणखी एक आवाज आला.

राजाने विक्रमला जवळ बोलावून घेतले. त्याची 'तू कुठला ? कोण ?' म्हणून चौकशी केली.

विक्रमने फक्त मी आनंदपूरचा एवढीच माहिती दिली. याबद्दल राजाने मनापासून स्वागत केले. व विक्रमला मोठ्या अधिकाराची जागा दिली.

इकडे विमल पूर्वेकडे चालू लागला. त्याला वाटेत मोठे जंगल लागले. त्या जंगलामध्ये आदिवासी लोक राहात होते. त्यांना ना शिक्षण, ना संस्कार, ना चांगली राहणी. विमल मनात विचार करू लागला. 'आपल्याच राज्यातील ही माणसे म्हणजे माझीच माणसे, या माणसांमध्ये आपण वर्षभर राहिलो तर? या माणसांसाठी वर्षभरात मला काही करता येईल का ?'

विमल विचार करीत होता. आणि विचारांती त्याचा निश्चय झाला–

'या आपल्या माणसांना जीवन म्हणजे काय हे दाखवले पाहिजे. ज्ञानाचा, संस्कृतीचा प्रकाश यांच्यापर्यंत पोहोचविला पाहिजे.'

'वेड्या, तू एकटा काय करणार ? आणि वर्षभरात किती गोष्टी करणार ?'

पण आतून दुसऱ्या आवाजाने साद घातली–

'वेड्या, चांगल्या कामासाठी काळाचे ना वेळाचे बंधन! चांगल्या गोष्टीला देव सामर्थ्य देत असतो' हे गुरुजींचे शब्द आठवले आणि विमलचा निश्चय पक्का झाला. आपल्या नियोजित कामाला सुरुवात करायची. येथेच, या लोकांत राहायचे. यांच्या जीवनात आनंदाचे, ज्ञानाचे नंदनवन फुलवायचे.'

तो एक राजकुमार होता. परंतु या लोकांत राहायचे, मिसळायचे म्हणजे साधे राहायला पाहिजे. विमलने साधे कपडे घातले प्रथम प्रथम त्या आदिवासींनी त्याला जवळही येऊ दिले नाही. त्यांची भाषाही त्याला नीटशी येत नव्हती. विचारांची देवघेवही करायला त्रास पडत होता. परंतु विमलची जिद्द मोठी. सुरवातीच्या या संघर्षाची त्याला जाण होती. त्यामुळे त्याने या साऱ्या अडचणींना आनंदाने तोंड दिले. हळूहळू संघर्षही नाहीसा झाला. त्या लोकांना विश्वास आला. हा कोणीतरी आपल्यासाठी चांगले करणारा माणूस आहे असा दिलासा आल्यावर तेच आदिवासी मदतीचा हात पुढे करू लागले.

आदिवासींच्या जीवनात अनिश्चितता फार. रानात शिकार करायची, कंदमुळे खायची. त्या त्या ऋतूत होणारी फळे खायची. नाहीच काही मिळाले तर वेळप्रसंगी उपासही काढायचा. विमलने विचार केला, ह्यांच्या आहारात नियमितपणा व निश्चितता आली पाहिजे. पोट नीट भरले तरच इतर सुचणार ना? आणि त्या सर्व आदिवासींना त्याने एकत्र जमवले. जंगलाची तोड सुरू झाली. थोडा भाग स्वच्छ करण्यात आला. तिथे सुरेख शेतांची आखणी करण्यात आली. योग्य वेळेला धान्य पेरण्यात आले. तेथील ऋतुमान व हवामान लक्षात घेऊन त्याने भाजीपाला व फळ-

बागाही लावल्या. सात–आठ महिन्यांत तेथील सर्व रूप पालटू लागले. शेतामधे धान्याची कणसे डोलू लागली. फळबागा फळांनी ओथंबून गेल्या. त्या भागात पाणी भरपूर. जमीनही चांगली सुपीक. फक्त तेथे कोणी तरी 'कल्पक' हवा होता. तो विमलच्या रूपाने मिळाल्यावर त्या भूमीत सोने पिकले. आदिवासींना आता कामाची आवड निर्माण झाली. ते विमलच्या प्रत्येक योजनेत मनापासून साथ देत होते, कामात मदत करीत होते.

अन्नधान्याचे थोडे स्वास्थ्य प्राप्त झाल्यावर विमल तेथील लोकांना, मुलांना थोडी अक्षरओळख करून देऊ लागला. गोष्टीरूपाने त्यांना आपल्या देशाची, त्यातील लोकांची, आपल्या संस्कृतीची व धर्माची माहिती तो करून देत होता. आणि वर्ष केव्हाच संपले. दसरा दोन दिवसांवर येऊन ठेपला.

विमलला परत आश्रमात परतायला हवे होते. गुरुजींची तशी आज्ञाच होती.

आपल्या आदिवासी मित्रांना त्याने जवळ बोलावून सांगितले 'मी आता परत जाणार आहे.'

आदिवासींना आश्चर्याचा धक्का बसला. कोणीही विमलला जाऊ द्यायला तयार नव्हते. त्याने सर्वांची समजूत घातली व तो म्हणाला–

'चांगले काम तुमच्या सर्वांच्या सहकार्याने सुरू झालेले आहे. तुम्ही ते पुढे चालू ठेवा. मी तुमच्या राजाला सांगेन तुमच्यासाठी व तुमच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय करायला.'

आदिवासी हसून म्हणाले–

'राजा कसा असतो ? तो तुमचं ऐकेल ?'

विमलने आपण राजकुमार असल्याचे कोणालाच सांगितले नव्हते. तो हसून म्हणाला–

‘ऐकेल ना. प्रजेची काळजी घेणाराच राजा आहे तुमचा. काही वेळेला प्रजेच्या व्यथा, काळजी राजाला समजतच नाही. पण एकदा समजली की चांगला राजा त्या दूर करतोच की.’

नंतर आदिवासींचा निरोप घेऊन विमल आश्रमाकडे यायला निघाला. दसऱ्याच्या आदल्या दिवशी तो आश्रमात पोहोचला. गुरुजींना त्याने वंदन केले. त्याच्या पाठीवरून हात फिरवीत गुरुजी म्हणाले–

‘विमल, वाळलास किती तू ! कसा प्रवास झाला तुझा ?’

विमल हसला व म्हणाला–

‘फारच छान ! जीवन खऱ्या अर्थाने पाहिले मी.’

विमल उत्सुकतेने वाट पहात होता आपल्या दादाची–विक्रमची. विक्रम अजून परतला नव्हता. इतक्यात चार–पाच ऋषिकुमार आश्रमात धावत आले. त्यांनी सांगितले, ‘आश्रमाच्या दिशेने मोठा लवाजमा येत आहे. पुढे हत्तीवर अंबारीत कोणी तरी बसलेले दिसत आहे व मागे काही हत्ती घोडेही दिसत आहेत. ‘विमल म्हणाला–

‘बाबा तर येत नसतील ना ?’

योगंधरायण म्हणाले–

‘छे ! छे ! स्वतःचे वैभव घेऊन महाराज कधीच येत नाहीत. आश्रमात, उलट एक दुसरेच वैभव अनुभवायला येतात ते कधी कधी येथे.’

ते सहेतुक हसले.

इतक्यात तो लवाजमा आश्रमाशी आला. हत्तीच्या अंबारीतून विक्रम उतरला. विमलने पुढे होऊन आपल्या दादाला मिठी मारली. विक्रमने गुरुजींना वंदन करून म्हटले–

'गुरुजी, आपली आज्ञा घेऊन मी शेजारच्या राज्यात एक वर्ष काढले. माझ्या बाहुबलावर मी तेथे अधिकाराची व मानाची जागा मिळवली. माझे हे वैभव याची साक्ष देईल.'

योगंधरायण नुसतेच हसले.

इतक्यात ठरल्याप्रमाणे महाराज जगमित्रा व प्रधानमंत्री आल्याची बातमी दिली. महाराज आश्रमात आले होते. आपल्या दोन्ही कुमारांना ठरल्याप्रमाणे ते न्यायला आले होते. आपल्या दोन्ही कुमारांच्या पराक्रमाची गाथा ऐकायला महाराज उत्सुक झाले होते.

राजाने ऋषिवर्यांना नमस्कार केला. ऋषिवर्य योगंधरायण म्हणाले–

'राजा, तुझे हे दोन्ही मुलगे दोन दिशेला जाऊन जग पाहून आले. विक्रमने आपल्या सामर्थ्याने हे वैभव मिळवून आणले आहे.'

विमलकडे वळून ते म्हणाले–

'विमल, तू काय काय मिळवलेस? काय पराक्रम गाजवलास?'

विक्रम आपल्या लाडक्या विमलचा पराक्रम ऐकण्यास उत्सुक झाला होता.

विमल नुसताच हसला. त्याने आपण वर्षभरात काय काय केले हे सांगितले. त्याचा तो लोकविलक्षण अनुभव सर्वजण नुसते ऐकत होते. विमलच्या पाठीवरून हात फिरवीत ऋषिवर्य योगंधरायण म्हणाले–

'राजा, या राजकुमाराला—विमलला आपण राजधानीत घेऊन जावे. त्याचे शिक्षण पूर्ण झाले आहे. विक्रमला मात्र अजून एक-दोन वर्षे येथे शिक्षणासाठी राहावे लागणार आहे.'

अपार वैभव व मानसन्मान मिळवणाऱ्या विक्रमचे शिक्षण अजून पूर्ण झाले नाही असे गुरुजी का म्हणतात? सर्वांनाच कोडे पडले. सर्व आश्चर्याने पहात होते. राजा मात्र शांत होता. ऋषि-वर्य योगंधरायणांच्या ठिकाणी त्याचा पूर्ण विश्वास होता. ऋषिवर्य पुढे म्हणाले—

'राजा, विमलचे शिक्षण खऱ्या अर्थाने पूर्ण झाले आहे. बाल-पणामध्ये ज्या चांगल्या गोष्टींचे बीज मनात रुजायला पाहिजे ते विमलच्या मनोभूमीत रुजले आहे. प्रेम, सेवा, त्याग, दुसऱ्यासाठी कष्ट करण्याची तयारी या अनुपम गुणांची 'अक्षय शिदोरी' विमलने आपल्याबरोबर बांधून घेतली आहे. स्वतः कष्ट करून पाहिले की दुसऱ्याच्या कष्टांची किंमत कळते. प्रेम, सेवा, त्याग हे नुसते चांगले विचार असून भागत नाही. विमलने ते आचर-णात आणले आहेत. गरिबांच्या प्रजेच्या दुःखात आपले दुःख व सुखात आपले सुख शोधले आहे. त्यांच्यासाठी कष्ट उपसले आहेत. त्यांना ज्ञानाचा दिवा आपल्या हातांनी दाखवला आहे. शस्त्र हा शेवटचा उपाय असतो. विमलही पराक्रमी, शूर आहेच. शस्त्रविद्येत विक्रमाप्रमाणे तोही पारंगत आहे. परंतु त्याचा आपल्या अंतःसामर्थ्यावर मनोबलावर विश्वास आहे. मनोबलाने प्रजा जिंकणारा राजा खऱ्या खऱ्या अर्थाने प्रजेला सुखी करू शकतो.

राजा, हे मी तुला सांगायला पाहिजे असे नाही.' आणि ते सहेतुक हसले.

राजा सर्व ऐकत होता. सर्व स्तब्ध होते. विक्रमही आपल्या धाकट्या भावाचे कौतुक ऐकत होता. तो म्हणाला–

'विमल तूच खऱ्या अर्थाने राजा व्हायला योग्य आहेस.'

विमल म्हणाला–

'नाही दादा, ऋषिवर्यांनी सांगितल्याप्रमाणे तू अजून एक-दोन वर्षांत ही 'अक्षय शिदोरी' बांधून येणारच आहेस. तोपर्यंत फक्त मी ही धुरा सांभाळणार आहे– रामाच्या भरताप्रमाणे.'

त्याच्या मनाचा मोठेपणा पाहून राजाने विमलला हृदयाशी धरले.

□ □

# नवलनगरीतील नगारा



एक होता राजा, देवराय त्याचं नाव. त्याच्या राज्याचे मूळचे नाव खरे म्हणजे दर्शनपूर, पण आता सर्वच या नगराला 'नवल-नगरी' म्हणू लागले होते. त्याचं असं झालं, या दर्शनपूरचा राजा देवराय फार गुणी होता. प्रजेवर तो मुलांप्रमाणे प्रेम करायचा. प्रजेची सर्व प्रकारे काळजी घ्यायचा. आपल्या प्रजेला चांगले अन्न मिळाले पाहिजे. राज्यातील उगवत्या पिढीला चांगले ज्ञान मिळाले पाहिजे. प्रजेचे आरोग्य उत्तम राहिले पाहिजे, ह्याकरिता तो कायम प्रयत्नशील असायचा.

देवराय जसा प्रजाहिततत्पर होता तसाच उदार होता. त्याच्या राज्यात तो गोरगरिबांना दानधर्म करी. त्यामुळे गोरगरीब सतत

त्याला आशीर्वाद देत. दिवाळीत तर राजाचा अनेक वर्षांचा नेम असायचा. दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी असंख्य लोक त्याच्याकडे काही ना काही मागायला येत. पाडव्याच्या दिवशी येणारा अतिथी कधीही विन्मुख जाता कामा नये अशी त्याची सर्वांना सक्त ताकीद होती. त्यामुळे दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी असंख्य लोकांची राजवाड्यामधे गर्दी होई. प्रत्येकजण आपणाला पाहिजे असलेली वस्तू राजाकडून घेऊन राजाला दुवा देत निघून जाई.

एक वर्ष मात्र नवल घडले. असाच दिवाळीचा दिवस होता. सर्व लोक सकाळपासून दाटीवाटीने राजवाड्यात येऊन आपणाला हवी असलेली वस्तू घेऊन निघून गेले, तरी एक साधू मात्र कोपऱ्यात तसाच उभा होता.

राजदूत पुढे आला व म्हणाला–

‘ आपणाला काय पाहिजे ?’

साधू नुसताच हसला व म्हणाला–

‘ मला महाराजांना भेटायचं आहे. ’

राजदूत उद्धटपणे म्हणाला–

‘ वा रे ! ज्याला त्याला महाराज भेटायला ते तुझ्यासारखे रिकामटेकडे नाहीत बाबा. तुला काय पाहिजे आहे ते सांग आणि मुकाट्याने ते घेऊन निघून जा ! ’

साधू म्हणाला–

‘ हे हात कुणापुढे घेण्यासाठी कधीही पुढे झाले नाहीत, ते आजही होणार नाहीत. हे हात तुझ्या महाराजांनाच ‘ देण्यासाठी ’ पुढे झाले आहेत ! ’

राजदूत हसला व म्हणाला–

'राजाला आपण देणार ? वा रे ! फारच शहाणे दिसता आहात.'

साधू शांतपणे उभा होता.

इतक्यात राजेसाहेबच पुढे आले. त्यांच्या कानावर राजदूताचे शब्द पडलेच होते. उत्सुकतेने त्यांनी साधूकडे पाहिले.

साधू म्हणाला–

'राजा, तुझे दातृत्व ऐकून मी मुद्दाम आलो आहे. याचक म्हणून नव्हे तर दाता म्हणून.'

राजा नम्रपणे म्हणाला–

'साधुमहाराज आपले आशीर्वाद हे आमचे भाग्य.'

राजाची नम्रता पाहून साधू मनात सुखावला व म्हणाला–

'राजा, तुझे दातृत्व ठीक आहे. परंतु दातृत्व सुद्धा योग्य ठिकाणी योग्य वेळेला दाखवले पाहिजे. तुझ्या दातृत्वाचा फायदा उठवून राज्यातील लोक आळशी बनत चालले आहेत. स्वार्थी बनत चालले आहेत. तुझ्या राज्यातील सर्व लोकांना योग्य कामात गुंतवून योग्य वेतन देणे हेच खरे राजाचे दातृत्व. परंतु अयोग्य दातृत्वाने तुझ्या राज्यात अनेक अनिष्ट गोष्टी घडत आहेत.'

राजा मनात चपापला. कारण हल्ली हल्ली त्याच्या कानावर अनंत कागाळ्या येत होत्या. चोऱ्या वाढल्या होत्या. शेतकरी शेतात योग्य कष्ट करीत नव्हते. कामकरी काम करीत नव्हते. वरवर सुबत्ता दिसणारे हे राज्य आतून ढासळत होते. राजा नम्रपणे म्हणाला–

'हो, साधुमहाराज, आपण म्हणता तशी परिस्थिती खरोखरच निर्माण होत आहे. मी मनातून काळजीतच असतो. मला वाटले,

लोकांना हवी असलेली वस्तू मिळत गेली की लोक सुखी होतील. परंतु परिणाम उलटाच घडतो आहे.'

साधू म्हणाला–

' तेच तुला सांगण्यासाठी मी आलो आहे. कष्टाविना मिळालेल्या पैशाची किंमत माणसाला कधीच कळत नाही. तुझ्या राज्यामधे घडणाऱ्या या अनिष्ट गोष्टींना आळा बसावा म्हणून मी तुला एक अद्‌भुत गोष्ट देणार आहे.'

राजा आपला अवाक होऊन ऐकत होता.

साधू पुढे म्हणाला,

' उद्या सकाळी तुझे सेवक उत्तरेकडे असलेल्या शिवमंदिरांत पाठव. त्यांना एक भव्य नगारा दिसेल. तो राजवाड्यात आणून ठेव. राज्यात कोणतीही अनिष्ट गोष्ट– चोरी, लबाडी, फसवाफसवी घडली की हा नगारा आपोआप वाजू लागेल आणि ज्या माणसाने असे पाप केले असेल त्याचे हात त्याला चिकटून बसतील.'

नगाऱ्याची ती अद्‌भुतरम्य गोष्ट ऐकून राजा आश्चर्यचकित झाला. राजाने पुढे येऊन साधूला वंदन केले. साधू निघून गेला.

हां हां म्हणता ही बातमी साऱ्या राज्यभर पसरली. 'आपल्या नगरात अद्‌भुत नगारा येणार' म्हणून काही लोक खूप आनंदात होते. आता राज्यातील फसवाफसवी, लबाडी, चोरी, काळा बाजार, सर्व बंद होईल म्हणून सज्जन लोक खुषीत होते. परंतु असाही काही वर्ग होता, तो मात्र मनातून हबकला होता. उद्या आपली चोरी उघडकीस येणार, उद्या आपण धान्यात केलेली भेसळ उघडकीस येणार म्हणून काही व्यापारीवर्ग भिऊन गेला

होता. असे काही ना काही पाप केलेले लोक रात्रभर तळमळत होते.

पहाटेची शांत वेळ. त्या भव्य शिवमंदिरात एक एक करून माणसे चोरपावलांनी गोळा होत होती. एक आला, दोन आले. दोनाचे दहा, दहाचे पंचवीस असे होता होता जवळजवळ शंभर-सव्वाशे माणसांनी त्या शिवमंदिराचे बाहेरील अंगण भरून गेले. त्यांची आपापसात कुजबूज चालली होती.

एक व्यापारी म्हणाला–

'काय करावे ? उद्या सारी प्रतिष्ठा धुळीस मिळण्याची वेळ आली आहे. गेल्या वर्षी मी धान्यामधे इतकी भेसळ केली आहे की ते पाप मला स्वस्थ बसू देईना. उद्या हा अद्‌भुत नगारा वाजू लागेल आणि आपले पाप उघडकीस येईल.'

तितक्यात दुसरा एक माणूस म्हणाला–

'तुमचे पाप काहीच नाही हो ! मी आहे सोनार. गेल्या महिन्यात महाराजांनी आपल्या राज्यातील राजदेवतेचे–लक्ष्मी–केशवाचे दागिने घडविण्यास मला सांगितले. मी एक तोळा सोन्यामधे पाव तोळा तांबे व चांदी मिसळून दागिने घडविले वर छान शंभर नंबरी सोन्याचे पॉलीश केले, बस्स ! मनात विचार केला, देवाचे दागिने त्यांचा कशाला होतो आहे वापर ? आणि वापर झाला तरच ना पॉलीश कमी होणार ! आता मात्र मला पश्चात्ताप होतोय. देवापाशी सुद्धा मी पाप केले. या नगाऱ्याची बातमी ऐकली आणि माझी झोपच उडाली बघा !'

तितक्यात तिसरा पुढे आला व म्हणाला–

'तुमचे गुन्हे माझ्यापुढे काहीच नाहीत हो. मी आहे एका औषधी कारखान्याचा मालक. मी औषधात सुद्धा भेसळ केली

हो. माणसाच्या जिवाशी मी खेळलो. मला केल्या पापाबद्दल फार धडकी भरली आहे. या नगाऱ्याची बातमी ऐकून तर–'

त्याला पुढे बोलवेना.

असा प्रत्येकजण आपण केलेला काही ना काही गुन्हा सांगू लागला.

इतक्यात एका व्यक्तीच्या मनात एक विचित्र विचार डोकावला. त्याने सर्व लोकांना जवळ बोलावले व तो म्हणाला–

'आपण सारेच समदु:खी आहोत. आणि या सर्वांच्या दु:खाचे कारण हा नगारा आहे. तर हा अद्भुत नगाराच आपण फोडून टाकला तर ?'

सर्वांनाच कल्पना एकदम पसंत पडली. सर्वजण त्या शिवालयाच्या भव्य अंगणातून शिवमंदिरात आले. गाभाऱ्यात त्यांनी डोकावून पाहिले. काळ्या पाषाणाच्या भव्य पिंडीच्या शेजारी एक अति भव्य नगारा टेकून ठेवलेला होता. प्रत्येकाचे मन धडधडत होते. हळूहळू एक एक जण गाभाऱ्यात गेला. धडधडत्या मनानेच सर्वजण गाभाऱ्यात गोळा झाले होते. त्या भव्य नगाऱ्याच्या भोवती सर्व गोलाकार करून उभे राहिले. गाभाऱ्यात एक विचित्र शांतता पसरली होती. प्रत्येकाच्या श्वासोच्छ्वासाचाच आवाज तेथे उमटत होता. शेवटी एकाने हात वर केला, त्याबरोबर दोन-तीनशे हात एकदम वर झाले. मूळ कल्पना सांगणाऱ्या त्या माणसाच्या इशाऱ्याने तो नगारा फोडण्यासाठी सर्वांचे हात त्या नगाऱ्यावर जोराने आपटले,

आणि काय आश्चर्य !

नगारा एकदम वाजू लागला– अगदी मोठ्याने. सर्वांचे हात त्या नगाऱ्याला घट्ट चिकटून बसले होते. प्रयत्नांची पराकाष्ठा

करूनही ते हात तेथून हलत नव्हते. सर्वांची भीतीने बोबडी वळली. अंगाला घाम फुटला. पाय लटपट कापू लागले.

पहाटेच्या शांत वेळी नगाऱ्यांचा तो घनगंभीर आवाज नगरात घुमू लागला. लोक खडबडून जागे झाले व आवाजाच्या रोखाने निघाले. राजाही आपल्या सेवकांना घेऊन मंदिरात आला. तेथील दृश्य पाहून अवाक झाला.

घनगंभीर आवाजाने सारे वातावरण निनादत आहे आणि जिवाच्या कराराने माणसे आपले हात नगाऱ्यापासून सोडवून घ्यायला धडपडत आहेत.

हळूहळू दिवस उगवला. गाभाऱ्यातील त्या माणसांच्या चेहऱ्यावर प्रकाश पडला. ते परिचित चेहरे पाहून राजाचे डोके सुन्न झाले. हात चिकटल्यामुळे ते आपले चेहरेही झाकू शकत नव्हते. राजाने विश्वास टाकलेले अनेक लोक त्याच्यात होते– प्रतिष्ठित म्हणून मिरवणारे.

इतक्यात साधू तेथे आला. त्याने त्या नगाऱ्याला स्पर्श करताच आवाज बंद झाला. सर्वांचे हात मोकळे झाले. राजाने तावडतोब सेवकांना आज्ञा केली. सर्वांच्या मुसक्या बांधण्यात आल्या.

एका भव्य गाडीवर तो नगारा सेवकांनी उचलून ठेवला. त्याच्यावर हार–तुरे घालण्यात आले. वाजत–गाजत तो भव्य नगारा राजवाड्यात आणण्यात आला.

आता त्या राज्यात सुबत्तेबरोबर शांतता व संस्कृती नांदते आहे. हा अद्‌भुत नगारा जणू एक जबरदस्त पहारेकरी बनला आहे. आजूबाजूच्या राज्यांतही या नगाऱ्याने वचक बसवला आहे. या अद्‌भुत नगाऱ्याच्या आगमनाने शेजारील राज्यांतील लोक या नगरीला आता 'नवलनगरीच' म्हणू लागले आहेत.

□ □

# भागू आली घरा



डोंगराच्या कुशीत ते होते छोटेसे गाव. त्या गावाचे नाव होते साखरीआगर. छोट्याशा त्या गावात सारी वीस–पंचवीस घरे होती. पण निसर्गाच्या कुशीत विसावलेले हे गाव मात्र होते फार सुंदर. पूर्वेकडे व दक्षिणेकडे छोट्याशा डोंगरांची रांग, पश्चिमेकडे वाहणारी रेवा नदी व नदीच्या कडेला शेत व मळे, उत्तरेला एका सरळ रेषेत वीस-पंचवीस घरे. घरांच्या समोर लाल भडक सडक. सुवासिनीने भांगात सिंदूर भरावा, तशी ती सडक सुरेख दिसायची. सूर्याची सोनेरी किरणे शेतमळ्यावर पडली की ते सर्व गाव जणू सौंदर्याने न्हाल्यासारखे दिसायचे.

अशा त्या छोट्याशा गावात रहात होता एक शेतकरी. विरू त्याचे नाव. त्याला एक मुलगी होती. तिचे नाव सुमन. नावाप्रमाणेच गुणी व मोठ्या मनाची ही मुलगी गावात सर्वांची लाडकी होती. कोणाचेही काम ती आपणहून करायची. परत वर 'मी काम केले' असा गर्वही नाही. शेजारच्या उमाकाकी रोज संध्याकाळी दुर्गादेवीच्या मंदिरात प्रवचनाला जायच्या तिन्हीसांजा होऊन जायच्या प्रवचन संपेपर्यंत, पण सुमा रोज त्यांना देवळातून घरी आणून पोहोचवायची काकी म्हणायच्या, 'सुमा, मला रात्री जरा कमी दिसते ना, म्हणून लागते कोणाची तरी सोवत. पण रोज नाही आलीस तरी चालेल. मला हवीच की सवय करायला.' सुमा तत्परतेने म्हणायची–'काकी, काही नको एकटीने यायची सवय करायला. आणि तुम्हाला आणायच्या निमित्ताने माझे पण रोज देवीचे दर्शन होतेच की.'

काकी म्हणायच्या–'अशी बोलण्यात पटाईत आहेस बाई तू! देव तुझे नेहमी कल्याण करील. बघ पोरी, माझा आशीर्वाद आहे म्हातारीचा.'

सुमा गालातल्या गालात फक्त हसायची. शेजारच्या सानेकाकांकडे दर सोमवारी शंकरावर घरातल्या देवांवर अभिषेक असायचा, सुमाला माहीत होते सानेकाकांना बिल्वदले लागतात पूजेला, रविवारी उमाकाकूंना घेऊन येताना परकराच्या ओच्यामधून सुमा ७/८ बिल्वदले न चुकता आणून सानेकाकूंना नेऊन द्यायची. सानेकाकू म्हणायच्या– 'सुमा, तू कशाला उगाच त्रास घेतेस. मी सांगणार होतेच बाबूला आणायला.' त्यावर सुमा उत्तरायची– 'त्यात कसला आलाय त्रास. मी मुद्दाम थोडीच जाते बेल आणायला? येता येता तर आणला.'

अशी ही सुमा. इतकी गुणी मुलगी आई–वडिलांची लाडकी असणारच. विरूची सुमा तर अगदी जीव की प्राण होती. विरू तसा काही श्रीमंत नव्हता. त्याचा छोटासा जमिनीचा तुकडा होता. त्यात तो थोडेसे धान्य पिकवायचा. विरूची बायको गिरजा पण कष्टाळू व हसतमुख होती. ती पण शेतात आनंदाने खपायची उरलेल्या भागात विरू भाजी, फळफळावळ लावायचा. भाजी व फळे विकून मीठ. मिरचीला पैसा व्हायचा. पुरेसे धान्य शेतात व्हायचे. तिघेही सुखासमाधानाने रहात होते. परंतु एक वर्ष मोठे संकटच आले. वरुणराजानेच अवकृपा केली. पाऊस ज़वळ जवळ पडलाच नाही. पाऊस नाही म्हणून पाणी नाही. रेवा नदी सुद्धा आटून गेली. धान्याचा कण पिकला नाही. भाजी व फळे तर मुळीच आली नाहीत. विरूपुढे मोठा प्रश्न पडला. सुमाची उपास-मार होऊ लागली. शेवटी विरूने निश्चय केला. एक वर्ष शहरात जाऊन रोजगार करायचा– नोकरी करायची व गिरजा आणि सुमाला येथेच ठेवून पैसे पाठवायचे.

ठरल्याप्रमाणे विरू शहरात गेला. तेथे त्याला कशीबशी नोकरी मिळाली. नोकरी छोटीच होती. आपल्या पोटापुरते पैसे ठेवून विरू गावी ज़ेमतेम ४० रु. पाठवू शकत होता. तेवढ्यात काय होणार ? सुमा, गिरजा व गोठ्यात आनंदी होती; आनंदीचा गोऱ्हाही होता. दोन माणसे व दोन ढोरे यांचे पोट कसे भरणार ? गिरजा रानात जाऊन लाकडांची मोळी आणून विकायची, तर छोटी सुमा कोणाच्या गोवऱ्या थापून द्यायची, कोणाची भाजी खुडायची.

दिवस चालले होते. दिवाळी आली. दुष्काळ व त्यातून महागाई. कोणाला दिवाळीचा उत्साहच नव्हता. सुमाला वाटलं बाबा

दिवाळीला येतील. पण विरू आलाच नाही. त्याने शेजारचा हरचंद आला त्याच्याबरोबर निरोप पाठवला, ‘ मी काही येत नाही. भाडेखर्च नको उगाच. सुमासाठी परकर-पोलका व थोडीशी मिठाई पाठवली आहे.’

सुमाला खूप वाईट वाटले, पण थोडा आनंदही झाला. तिच्या बावाने तिला परकर–पोलवे. पाठविले होते ना ! त्या आनंदात तो बालजीव बाकी सर्व विसरून गेला.

वसु-बारशाचा दिवस होता. घरात काही तरी गोड हवे म्हणून दारातल्या भोपळ्याचे थोडे घारगे गिरजाने केले. सुमा सकाळी लवकर उठली. रानात जाऊन तिने चाफ्याची फुले आणली. तीन माळा केल्या. एक आनंदीच्या व एक तिच्या गोऱ्ह्याच्या गळ्यात घातली व एक दारावर तोरणासारखी टांगली. गिरजाने आईला ओवाळले व दोन घारग्यांचा घास आनंदीला व तिच्या पाडसाला घातला. आनंदीच्या अंगावरून हात फिरवीत सुमा म्हणाली ‘ आनंदी, यंदा घारगेच घे. आता पुढल्या वर्षी खूप पाऊस पडला की पुरणाची पोळी देऊ तुला. हो, बाबांना मी तुझ्यासाठी झूल व छोटे घुंगरू पण सांगितलेत आणायला.’

त्या मुक्या जनावराला जणू ती प्रेमाची भाषा समजली. आनंदीने आपली मान सुमाच्या हातावर घासली तिन्हीसांजा झालेल्या होत्या. गिरजा आत गेली व सुमा दारातच बसली होती. शेजारची येसू, वृंदा फुलबाजी उडवीत होत्या, त्या पाहण्यातच ती दंग होती. इतक्यात अंगणात कोणी तरी आल्याचा भास झाला. सुमा म्हणाली, ‘ कोण ते ?’

आवाज आला– ‘ मी, भागू !’

‘ कोण भागू ?’

असें म्हणत सुमा पुढे गेली.

फाटकापाशी एक नऊ दहा वर्षाची मुलगी उभी होती. तिचा चेहरा सतेज होता. डोळे तेजस्वी व टपोरे होते. पण अंगावर अगदीच फाटके कपडे होते. अगदी लक्तरे झालेले.

सुमा कोणाशी बोलते आहे हे पाहण्यासाठी वृंदा व येमू पण जवळच तेथे आल्या. ती मुलगी म्हणाली–

‘मी भागू. माझे आईवडील फार गरीब आहेत. मला पण फटाके– फुलबाजी उडवावेसे वाटतात. तुमच्यातील द्या की मला थोडेसे.’

वृन्दा व येसू कडाडल्या–‘भिकारड्डी ती भिकारड्डी आणि वर ऐट केवढी ! म्हणे मला ही फुलबाजी उडवायची म्हणून !’

सुमा त्यांना दाबीत म्हणाली–‘वृन्दा, येसू, असे वसकन ओरडू नये कोणाच्या अंगावर.’ आणि त्या मुलीकडे वळून ती म्हणाली, ‘मी देईन हं तुला माझी फुलबाजीची पेटी. मला दिल्येय सानेकाकूंनी.’

वृन्दा कडाडली – ‘म्हणजे आईनेच ना ? तरीच ! म्हटलं माझ्यातली एक पेटी कमी कशी झाली ?

येसू म्हणाली–‘सुमे, तूही तिच्यासारखीच भिक्कारडी ! दुसऱ्या कडून तोंड वेंगाडून घ्यायचे आणि दान केल्याचा खोटा आव आणायचा; ढोंगी कुठली !’

येसू व वृंदा तणतणत निघून गेल्या. सुमा त्या मुलीला म्हणाली, ‘भागू, तू नको वाईट वाटून घेऊ. मी देते हं तुला माझी पेटी. चल ये पाहू घरात.’ भागूचा हात धरून सुमा घरात आली. गिरजा देवापाशी दिवा लावीत होती. तिने मागे वळून पाहिले व विचारले–‘सुमा, कोणाशी बोलतेस ग ?’

'आई, ही भागू आली आहे बघ.' सुमा म्हणाली. गिरजा म्हणाली–'भागू? हं ऽऽ हं, म्हणजे भाग्यश्री. भाग्यश्रीच ना तुझं नाव, मुली?' भागू अर्थपूर्ण हसली व म्हणाली– 'मला माहीत नाही. मला सर्वच भागू म्हणतात.' भागू म्हणाली, 'मला खूप भूक लागली आहे.' गिरजा म्हणाली. 'चल बाई, तुला व सुमाला जेवायला देते.'

घरात चार-सहा घारगे व थोडाच भात होता. सुमाने केळीची पाने मांडली. भागूच्या पानाभोवती छानशी रांगोळी घातली. दोघी जेवायला बसल्या. दुरडीतील घारगे पाहून सुमा म्हणाली, 'आई, मला भातच घाल बाई, मला फार भूक नाही.'

आई मनोमनी समजली व सुमाचा शहाणपणा पाहून सुखावली. भागू पोटभर जेवून उठली. ठिकठिकाणी फाटलेले आपले परकर-पोलके ती सारखी सावरीत होती. सुमाने चटकन उठून ट्रंकेमधून आपल्या बाबांनी पाठविलेले नवीन परकर-पोलके काढले व भागूला दिले. भागूचा आनंद गगनात मावेना. ती परकर-पोलके नेसली. अगदी हरखून गेली. गिरजा आत आवराआवर करायला गेली. सुमा व भागू सतरंजीवर गप्पा मारता मारता झोपी गेल्या. गिरजा मनात म्हणाली–'कोणाची पोर कोण जाणे! पण आहे कशी नक्षत्रासारखी! झोपली आहे, झोपू दे. उद्या चौकशी करून पोहोचवून देऊ.'

सकाळ झाली. सूर्याची सोनेरी किरणे अंगणात पसरली. सुमा झोपेतून जागी झाली. शेजारी भागू नव्हती. तिला वाटले असेल अंगणात. ती अंगणात आली. तर काय आश्चर्य स्वच्छ सारवलेल्या अंगणामध्ये कुंकवाची छोटी छोटी पावले उमटली होती. परन्तु

त्या पावलांचे ठसे हे घराकडे येत होते. हचा कुणाच्या पाऊलखुणा ? भागू गेली म्हणावे तर पावलांचे हे ठसे घराकडे कसे वळले आहेत ? सुमा पळतच घरात गेली.

गिरजा अजून झोपलीच होती. परंतु तिच्या चेहऱ्यावर मंद हास्य होते. तिला झोपेतून जागे करीत सुमा म्हणाली – ‘आई, ऊठ– ऊठ, अगं, भागू कोठे दिसत नाही, आणि अंगणात कुंकवाच्या खुणा उमटल्यात.’

गिरजा म्हणाली, ‘माहीत आहे मला.’

सुमा तोंडात बोट घालीत म्हणाली, ‘तू तर आत्ताच उठत आहेस, तुला काय माहीत.

गिरजा म्हणाली, ‘सुमा मला स्वप्न पडले. अगं, ती भागू कसली, भाग्यश्री देवी. तिनेच मला स्वप्नात येऊन सांगितले– ‘तुझे व सुमाचे आतिथ्य व प्रेम पाहून मी संतुष्ट झाले आहे. आता मी येथेच राहणार पिढ्यान् पिढ्या. जोपर्यंत येथे प्रेम, श्रद्धा, दया आहे तोपर्यंत या घरात राहणार.’

सुमाने आईला हात धरून ओढतच अंगणात नेले. कुंकवाच्या पाऊलखुणा दाखविल्या. गिरजा मनोमन सुखावली. तिचे लक्ष सहज परसातील केळीवर गेले. सूर्याच्या उन्हात तेथे सोनकेळीची पिवळी धमक लोंगरं चमकत होती. पाण्याअभावी खुरटलेली भाजी टवटवीत झाली होती. डाळिंबाचे झाड फळांनी वाकले होते. आनंदी हंबरली. परसातील विहीर स्वच्छ पाण्याने वहात होती. म्हणून दोघी गोठ्यात गेल्या. आनंदीही तृप्त दिसत होती. तिची कास दुधाने ओथंबली होती.

गिरजा व सुमा या साऱ्या प्रकाराने आश्चर्यचकित होत होत्या. मनात सुखावत होत्या.

दोघीही आत आल्या. धान्याचे रांजण भरलेले, सर्व घर धन-धान्याने भरून गेलेले. दोघींनी देवाचे खूप आभार मानले. सुमा म्हणाली–" आई बाबांना दिवाळीत यायला सांगू या ना ? आता नोकरी नको आणि काही नको.

गिरजा आनंदाने उद्गारली–' सुमा, आजच कळव तुझ्या बाबांना. येथेच श्रम करून राहू. घरी भाग्यश्री आली आहे, समृद्धी आली आहे.'

□ □

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र. २९९२ दिनांक 3/3/8
विषय बा. वा. क्र.

# नवरत्नांचा हार



विजयपूरचा भव्य राजवाडा आज माणसांनी फुलून गेला होता. त्याला कारणही तसेच होते. हो, आज जवळ जवळ दोन तपांनी विजयपूरवर स्वातंत्र्यसूर्य उगवण्याचा मंगल दिवस उजाडला होता. या सुखसोहळ्याचे स्वागत करता करता जनता नुसती आनंदाने बेहोष झाली होती. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी गेली ४–५ वर्षे अनेक नररत्नांनी आपले देह धारातीर्थी ठेवले होते. स्वातंत्र्य-यज्ञात अनेकांनी हसतमुखाने बलिदान केले होते. यज्ञ-देवता संतुष्ट झाली आणि तिनं स्वातंत्र्याचा हा पसाय दिला होता.

महाराज समरसेनांचे वडील वृद्ध असताना मित्र मित्र म्हण-विणाऱ्या विलासपूरने अचानक हल्ला करून हे राष्ट्र जिंकले होते. समरसेन स्वभावाने मवाळ, सच्छील वृत्तीचे. परंतु राज-कारणाच्या आखाडयात ' ठकासी व्हावे ठक ' तत्त्वज्ञान उमजण्या-साठी त्यांना स्वातंत्र्य गमावल्यावर जाग आली. आज त्यांचे सिंहाचे छावे– राजकुमार, अमर व अजय यांनी आपल्या बाहु-बलाने ही विजयश्री खेचून आणली होती. विजयनगरचे हे लाडके राजकुमार प्रजेचे अगदी जीव की प्राण बनले होते. या विजयी वीरांची भव्य मिरवणूक राजप्रासादामधून नगरात मिरवणार होती. त्यासाठीच सर्व राजप्रासादात जमले होते.

ठिकठिकाणी गुढया-तोरणे उभारली होती. आम्रपल्लवांनी व विविध फुलांनी नगरी सजवली होती. रस्त्यावर अत्तराचे व केशराचे सडे पडले होते. रंगीबेरंगी सुंदर रंगावलींनी राजरस्त्या-वर पायघडया अंथरल्या होत्या. सुवासिनी हातात पंचारती घेऊन या विजयी वीरांचे स्वागत करीत होत्या. गुलालाने आभाळाला जणू रक्तिमा चढला होता. रत्नजडित सुवर्णरथात मधोमध राजे समरसेन व त्यांचे हे सुपुत्र दोन बाजूंना बसले होते. रामाच्या शेजारी लव-कुश बसावे तसे. ' स्वातंत्र्यदेवतेचा विजय असो ! ' ' अमर-अजय की जय ! ' या आरोळयांनी वातावरण दुमदुमून जात होते. अशी ही अपूर्व मिरवणूक परत राजप्रासादामध्ये आली.

प्रवेशद्वाराजवळ तोफांची सलामी होऊन महाराज समरसेन सुवर्णसिंहासनावर स्थानापन्न झाले. अजयसिंह व अमरसिंहही आपापल्या जागांवर स्थानापन्न झाले. डाव्या बाजूला सर्व विजयी वीर हसतमुखाने उभे होते. त्यांच्यापुढे सेनाधिकारी बसले होते. उजव्या हाताला मंत्रिमंडळ, नगरातील प्रतिष्ठित स्थानापन्न

झाले होते. गॅलरी, सज्जामधून जिथे जागा मिळेल तिथे प्रजा दाटीवाटीने बसली होती. सभेच्या कामाला सुरुवात झाली. प्रधान मंत्री वीरसेन यांनी एक रत्नजडित संदूक आणून महाराजांच्या हातात दिली. महाराज समरसेन उभे राहिले व नम्रतापूर्वक ती संदूक कपाळाला स्पर्श करून बोलू लागले,

'प्रजाजन हो ! आज विजयपूरच्या इतिहासातले हे सुवर्णपान ! यापुढची पाने अशीच सुवर्णांकित होत राहतील. ही नगरी अशीच कायम वैभवाने, तेजाने तळपत राहील अशी मला खात्री आहे. याच स्वातंत्र्यदिनी मी एक शुभ घोषणा करीत आहे. तेव्हा हा राज्याचा भार मी माझ्या दोन कुमारांवर सोपवू इच्छितो. दोघेही एका दिलाचे आहेत. शूर वीर आहेत. जनतेने या दोघांपैकी एकाला राजा निवडावे. कारण राज्याला राजा हा पाहिजेच. राज्य जरी दोघांनी चालवले तरी राज्यकारभाराच्या दृष्टीने एकाला गादीवर बसणे आवश्यक आहे.'

अमर-अजय एकमेकांकडें पाहून हसले.

प्रजेलाही पेच पडला. कारण अमर-अजय हे दोघे जुळे भाऊ. त्यामुळे ज्येष्ठत्वाच्या मानाने राजा निवडणे अशक्यच होते. बरे, या दोघांत सरस, नीरस ठरवणे अशक्य. दोघेही सारखेच शूर, दिलदार. अजय म्हणणार, अमर राजा होईल; अमर म्हणणार, अजय राजा होईल.

नागरिक स्तब्ध होते. महाराज पुढे बोलू लागले, 'प्रजेने हा निर्णय सावकाश विचाराने करावा, आजच त्याची घाई नाही. दुसरी गोष्ट–माझ्या वडिलांनी– थोरले महाराजांनी मरणसमयी ही रत्नजडित संदूक मजजवळ दिली व सांगितले, 'बेटा समर,

ज्या वेळी आपले गेलेले वैभव परत येईल, ही मायभूमी स्वतंत्र होईल, त्या दिवशी ही संदूक उघड.'

सर्व जनता स्तब्ध झाली. काय असावे त्या संदुकीमध्ये? कोणाचाच तर्क चालेना. महाराजांनी हेतूपूर्वक प्रधानाकडे पाहिले. प्रधानांनी चटकन पुढे येऊन ती सुंदर संदूक उघडली व त्यातून एक पत्र बाहेर काढले. महाराजांनी प्रधानांना पत्र वाचण्यास अनुज्ञा केली.

नम्रतेने मान लववून प्रधानांनी ते पत्र उलगडले व वाचण्यास प्रारंभ केला-

'बेटा अमरसिंह, आजचा हा शुभ दिन पाहण्यास मी नाही परंतु माझे डोळे मात्र स्वर्गातून येथेच लागले आहेत. स्वातंत्र्य-देवतेच्या गळ्यामध्ये नवरत्नांचा हार घाल, एक वर्षाच्या आत.'

पत्रातील शेवटच्या वाक्याने सर्व बुचकळ्यात पडले. एवढे अफाट वैभव असलेल्या राजाला नवरत्नांचा हार का कठीण होता? राजेही विचारात पडले. काहीसा विचार करून ते मनात म्हणाले, 'यामागे काही तरी संकेत असावा. आणि त्यांच्या मनात चटकन विचार आला– जो कोणी स्वकष्टाने असा हार मिळवील त्याला ही राज्यलक्ष्मी द्यावी.

महाराज परत बोलू लागले, 'थोरल्या महाराजांचा शब्द आपण प्रमाण मानला पाहिजे म्हणून मी असे जाहीर करतो, जो कोणी एक वर्षाचे आत आपल्या बाहुबलाने असा हार मिळवून आणील त्याला ही राज्यलक्ष्मी माळ घालील.' त्यांनी साभिप्राय अमर व अजयकडे पाहिले. ते पुढे म्हणाले, 'प्रजेलाही हे आव्हान आहे.

...३

प्रजेपैकी कोणताही तरुण हे आव्हान स्वीकारू शकतो.' असे म्हणत आपली नजर त्यांनी सभागृहात सगळीकडे फिरवली.

सभा बरखास्त झाली. प्रजा महाराजांच्या घोषणेने आनंदित झाली. अनेक वीरांचे बाहू स्फुरू लागले. एक अकल्पित आव्हान नवतरुणांपुढे उभे होते.

* * *

स्वातंत्र्याचा पहिला वाढदिवस. एक वर्षापूर्वीच विजयपूरच्या राजप्रासादामधून एक अकल्पित आव्हान स्वीकारून अनेक तरुण बाहेर पडले होते. अजय व अमरही त्यात होतेच. आज या सर्वांनी मिळवलेल्या यशाचे योग्य मूल्यमापन ठरवले जाणार होते. विजयी वीराला विजयपूरची राज्यलक्ष्मी माळ घालणार होती. प्रजेला आज नवीन राजा लाभणार होता. सर्व प्रजाजन मनामधून अजय किंवा अमर या दोघांपैकी 'राजा' लाभावा म्हणून प्रार्थना करीत होते. कारण दोघेही होतेच तसे शूर, वीर व प्रजाहिततत्पर.

दरबार भरला. राजे समरसेन आपल्या रत्नजडित सिंहासनावर बसले. डाव्या बाजूला कुमार अमर व उजव्या बाजूला कुमार अजय बसले होते.. दरबार आनंदाने व उत्साहाने मोहरला होता. प्रत्येकाची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. प्रत्येकजण नवीन राजाच्या स्वागतासाठी अधीर झाला होता. दरबारच्या कामाला सुरुवात झाली. प्रधान मंत्री उभे राहिले. राजाची अनुज्ञा घेऊन ते म्हणाले–

'नागरिकहो ! आजचा दिवस भाग्याचा. आज स्वातंत्र्याचा पहिला वाढदिवस. आजच्या या शुभदिनी आपल्याला नवीन राजेसाहेब लाभणार आहेत– कर्तबगार, गुणग्राही, कुशल तसेच शूर. सर्व प्रजाजनांना आठवत असेल, गेल्या वर्षी याच दिवशी

नवरत्नांच्या हाराचे आव्हान अनेक तरुणांनी स्वीकारले आहे, तरी त्यांनी आता आपले कर्तृत्व पुढे येऊन कथन करावे.'

एक तरुण पुढे आला–

'महाराज, मी आहे व्यापारी. गेले वर्षभर देशोदेशी सचोटीने व्यापार करून मी हा नवरत्नांचा हार करवून घेतला. याची किंमत झाली आहे एक लाख रुपये. महाराजांनी हा हार स्वीकारावा.' असे म्हणत त्यांनी आपल्याजवळील चंदनी पेटी उघडून प्रधान मंत्र्यांच्या हातात दिली.

एवढ्यात दुसरा तरुण पुढे आला–

'महाराज, मी शेतकरी आहे. मी माझ्या गावी शेतीचे अनेक प्रयोग केले. अमाप पीक काढले. वसुंधरा प्रसन्न झाली व मी हा नवरत्नांचा हार स्वातंत्र्यदेवीसाठी करवून आणला. याची किंमत महाराजांनीच करावी.' नऊ सतेज धान्यांचा तो नऊपदरी हार होता. त्याची कल्पकता पाहून सर्व लोकही चकित झाले.

असे अनेक तरुण पुढे आले व अनेक हार चढत्या किंमतीने राजापुढे सादर करण्यात आले.

राजाने हसून अजयकडे पाहिले.

प्रजा उत्सुकतेने तटस्थ झाली. काय सांगणार अजयसिंह ?

अजय उभा राहिला व त्याने टाळी वाजवली. त्याबरोबर नऊ नोकर पुढे आले. प्रत्येकाच्या हातात एक पेटी होती.

अजयसिंह म्हणाला– 'महाराज, आपणा सर्वांचा निरोप घेऊन मी बाहेर पडलो. गेल्या वर्षभरात माझ्या बाहुबलाने मी अनेक राजांना मांडलिक बनवले. त्यांच्याकडून ही अगणित संपत्ती मिळवली. या संपत्तीची मोजदाद लाखात होण्यासारखी नाही. असे म्हणून अजयने नोकरांना इशारा करताच प्रत्येक नोकराने

पेटी उघडली. आतील अगणित संपत्ती पाहून प्रजा आनंदाने वेडी झाली.

‘ अजयसिंह की जय ! ’ ‘असाच शूर-वीर राजा हवा आम्हाला..

महाराज समरसेनांनी हात वर करताच परत शांतता पसरली' महाराजांनी साभिप्राय पाहिले.

अमर पुढे झाला.

महाराज, मी जी नवरत्ने आणली आहेत ती एका दृष्टिक्षेपात पाहून होण्यासारखी नाहीत. तरी कृपया महाराजांनी मला थोडा वेळ द्यावा.

महाराजांनी संमतिदर्शक मान हलवली. कुमार अमरने इशारा देताच तजेलदार चेहऱ्याचा एक तरुण पुढे आला. त्याच्या मागोमाग तंबोरे घेतलेले दोन साक्षीदार आले. महाराजांना लवून मुजरा करून दरबारातील रुजाम्यावर ते स्थानापन्न झाले.

प्रजेला व राजाला कळेना हा काय प्रकार आहे !

इतक्यात तंबोऱ्यामधून उमटणाऱ्या झंकाराने सर्वांचे लक्ष वेधले. अत्यंत सुरेल आवाजाने त्या तरुणाने गायला सुरुवात केली. दाणेदार तान, मुलायम स्वर व रागानुरूप मुद्राभिनय– हा हा म्हणता सर्व दरबार मंत्रमुग्ध झाला. तो वसंतबहार आळवीत होता. अंगावर पारिजातकाची फुले पडावी असे सर्वांना वाटत होते. सर्व सभा नहात होती. स्वरांनी व आनंदाने– गाणे संपले. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. अमरने परत इशारा दिला.

दुसरा एक तरुण पुढे आला. हा होता शिल्पकार. बरोबर आणलेल्या आपल्या शिल्पकृतीचा एक सुंदर नमुना त्याने राजेसाहेबांपुढे ठेवला. प्रधानांनी समोरील मेजावर ती शिल्पकृती

ठेवली. प्रजाजनांच्या तोंडामधून ' ओहो ऽऽ ' असे शब्द उमटले. ती शिल्पकृती होती आपल्या सोनुल्याला स्तनपान करणाऱ्या एका मातेची. मातेच्या चेहऱ्यावरील वात्सल्य व दुग्धपानाने तृप्त झालेले बालकाचे अर्धोन्मीलित डोळे– हे भावदर्शन काही आगळेच होते; अप्रतिम होते. अचेतन दगडामधून साकार झालेले हे भावसौंदर्य पाहून सर्वांची मती कुंठित झाली.

अमरने परत इशारा केला. एकामागोमाग एकेक तरुण येऊन उभे राहू लागले. अमर परिचय करून देत होता–

' हे उत्तम नर्तक आहेत.'

' हे उत्तम चित्रकार आहेत. '

' हे उत्तम योद्धे आहेत.'

' हे महाकवी आहेत. '

' महाराज, आपण नऊ रत्ने आणायला सांगितली परंतु माझ्या सुदैवाने देशभर प्रवास करताना अशी अनेक गुणरत्ने मला या देशात मिळाली ती सर्वच मी स्वातंत्र्यदेवीसाठी घेऊन आलो आहे ! '

अमरसिंहाचे बुद्धीने व गुणग्राहकतेने सर्व आश्चर्यचकित झाले.

राजे समरसेन उठून उभे राहिले आपल्या. हातांनी त्यांनी राजमुकुट अमरच्या मस्तकावर ठेवला. प्रजाजनांनी जयजयकार केला–

' राजे अमरसिंहांचा विजय असो ! '

समरसेन पुढे बोलू लागले–

' प्रजाजनहो ! अमर राजा झाल्याबद्दल आपण आत्ताच आनंद प्रदर्शित केलात. राजा असाच पाहिजे– गुणग्राहक. अमर व अजय दोघेही शूर– वीर आहेत. परंतु राज्य चालवताना केवळ शौर्य

असून भागत नाही. प्रजेची सुखदु:खे समजून घेणारा, प्रजेच्या गुणांना वाव देणारा गुणग्राहक व रसिक असाच राजा हवा. यास्तव अमर आजपासून विजयपूरचे ' राजे ' झाल्याचे मी जाहीर करतो. अजयसिंह हा सेनानी वृत्तीचा व महत्त्वाकांक्षी असल्यामुळे राज्याची संरक्षणयंत्रणा त्याने सांभाळावी. मुख्य प्रधान म्हणून मी त्याची नेमणूक करीत आहे. तसेच व्यापारविषयक आवड असलेला हा तरुण व्यापारमंत्री व शेतीमध्ये काही नवीन करून इच्छिणाऱ्या या तरुणाला कृपिमंत्री म्हणून मी नियुक्त करीत आहे.'

अशा प्रकारे आव्हान स्वीकारलेल्या प्रत्येक तरुणाला त्याच्या कर्तवगारीनुसार व गुणाप्रमाणे दरवारात काम मिळाले.

विजयपूरचे सर्वच नागरिक आनंदाने फुलून गेले. त्यांचा लाडका अमर आज राजा झाला होता.

' अमरसिंहांचा विजय असो ! ' या निनादाने दशदिशा भरून गेल्या.

* *

२९६२

## दुधाचा समुद्र



वेळणेश्वर त्या गावाचे नाव. त्या गावात एक साधू राहत होता. रामजीबावा त्याचे नाव. रामजीबाबा सर्वांना मदत करायचा. गावामध्ये कुणाचे– दुखले खुपले बघायचा. रामजी-बावाला नुसते समजायची खोटी, की दुसऱ्याच्या मदतीसाठी

आपणहून धावायचा. कोणाच्या बोलावण्याचीही त्याने कधी वाट पाहिली नाही.

रामजीबाबा गावाच्या बाहेर एक झोपडी बांधून राहायचा. झाडपाल्याची त्याला किती तरी औषधे माहीत होती. कोणाला साप, विंचू चावला तर गावातले लोक त्या माणसाला बिनधास्त रामजीबाबाच्या झोपडीत आणून ठेवायचे. सर्वांची खात्री, रामजी-बाबाच याला फक्त बरे करू शकेल. गुरांढोरांचे किती तरी आजार रामजीबाबा बरे करायचा. कुणाची म्हैस दूध कमी देते– जा रामजीबाबाकडे, कुणाची गाय चारा खात नाही– जा रामजीबाबाकडे. गावात येणारे प्रत्येक संकट, अडचण रामजी-बाबाने निवारण्याचा वसा घेतला होता जणू. आणि एक दिवस या घेतलेल्या वशाचीच कसोटीची वेळ आली.

वेळणेश्वर गाव ते केवढे! गावात सारा वीस-पंचवीस उंबरा. तसं अत्यंत सुखवस्तू गाव. सह्याद्रीच्या कुशीत वसलेले हे छोटेसे गाव शंकराचे जागृत स्थान म्हणून ओळखले जाई. तेथील जागृत दैवत वेळोबाच्या यात्रेला साऱ्या पंचक्रोशीतील लोक एकत्र येत. हे गाव मोठे सुंदर. सह्याद्रीच्या पायथ्याशी साळीची शेते डुलत असायची. पुढे एका सरळ रेषेत २०।२५ घरे. त्यामागे नारळी-पोफळीच्या बागा व त्याच्या मागे खूप मोठ्या प्रशस्त आवारात वेळोबाचे मंदिर. गावामधून कोठूनही पाहिले तरी वेळोबाच्या मंदिराचा कळस दिसायचा. मंदिर फारच भव्य. काळ्या पाषाणाचे हेमाडपंती बांधकाम. मधोमध मुख्य मंदिरात वेळोबाच्या रूपाने शिवशंकर स्थानापन्न झालेले. आणि चार कोपऱ्यांना चार दुर्गा, गणपती, लक्ष्मीकेशव व सूर्य अशी चार देवतांची चार छोटी मंदिरे. पूर्ण असे शिवपंचायतन म्हणून अवघ्या कोकणपट्टीत

प्रसिद्ध अशा या निसर्गरम्य गावावर मात्र एकदा निसर्गाचा कोप झाला. तीन-चार वर्षे पाऊसच पडला नाही. सर्व लोक दरवर्षी पावसाची वाट पाहताहेत. जरा पाऊस शिडकला की पेरणी करताहेत. पण पेरलेले बी वाळून जायचे. भरपूर पाऊस पडलाच नाही. उगाच एखादी हलकी सर आशा लावून जायची आणि मग महिना महिना रखरखीत ऊन्ह. लोकांची अन्नान्नदशा झाली. रामजीबाबा लोकांचे हाल नुसते पाहत होता. तो तरी काय करणार ? त्याला ते दुःख सहन होईना. त्याने देवाला साकडे घालायचे ठरवले.

रामजीबाबा अन्नपाणी वर्ज्य करून वेळोबाच्या मंदिरात ध्यानस्थ बसले. एक दिवस झाला, दोन दिवस झाले. असे दोन महिने लोटले. आणि देवाला दया आली. पहाटेची शांत वेळ. भगवान शिवशंकर रामजीबाबापुढे प्रगट झाले आणि म्हणाले, ' ऊठ रामजी, तुझे दुसऱ्यासाठी प्रेम पाहून मी संतुष्ट झालो आहे. आजपर्यंत अनेक भक्त पाहिले. कोणी स्वतःला पुत्र व्हावा म्हणून तर कोणी स्वतःला काही सिद्धी व्हावी म्हणून स्वतःसाठी तपश्चर्या करणारे अनेक लोक पाहिले. दुसऱ्यासाठी साधना करणारा तू खरोखरच धन्य आहेस. तुझी मनीषा मी जाणतो या मंदिराच्या पश्चिम दिशेने तुझ्या इच्छेला येईल तेवढे चालत रहा. एक नवल घडेल आणि तुझे मनोरथ पूर्ण होतील. मात्र प्राप्त झालेल्या गोष्टींचा साठा करायचा नाही की विक्री करायची नाही. नाही तर हे नवलच संपून जाईल. '

रामजीबाबा भानावर आले. झाला तो भास ? की स्वप्न ? त्याने समोर पाहिले. काळ्या संगमरवरी दगडाची पिंडी पांढऱ्या फुलांनी डवरलेली होती. रामजी एकटक देवाकडे पाहत होता.

आणि नवल घडले. एक पांढरे टवटवीत फूल पिंडीवरून ओघळून खाली पडले. रामजी मनोमनी समजला. सुखावला. 'देवाने शुभ कौल दिलाय. छे ! हे स्वप्न नाही, भास पण नाही. देवाने दिलेला तो संदेश आहे !' रामजी मनाशी म्हणाला.

भक्तिभावाने त्या भव्य पिंडीवर त्याने डोके टेकले व तो उठला. लगबगीने मंदिराच्या बाहेर आला. पहाटेची शांत वेळ. मंद मंद गार वारा सुटला होता. हवेत सुखद गारवा होता. शुक्राची चांदणी पूर्वक्षितिजावर चमकत होती.

मंदिराच्या आवारातील मोगरा, जुई, पारिजात आदी फुलांचा मिश्र सुगंध मन प्रसन्न करीत होता. रामजीबाबा भगवान शंकरांनी आदेश दिल्याप्रमाणे मंदिराच्या मागील बाजूस पश्चिमेकडे वळले. ओठांमधून 'ॐ नमः शिवाय' शब्द ओघळत होते. प्रत्येक पावलात विश्वास होता, उत्साह होता, आनंद होता. पूर्व क्षितिजावर सूर्यदेवांच्या आगमनाची चाहूल लागू लागली होती. रामजीबाबा चालतच होता.

हळूहळू सूर्य वर आला. पाखरे किलबिलत होती. सूर्याच्या सोनेरी किरणांनी सारी सृष्टी चैतन्यमयी झाली. रामजीबाबा क्षणभर उभा राहिला. उगवत्या देवाला त्याने नमस्कार केला. सहज त्याची दृष्टी मागे वळली. मनात उत्सुकता होतीच देवाच्या राज्यातील नवल पाहण्याची. मनुष्य स्वप्नातसुद्धा कल्पना करू शकणार नाही असे नवल घडले होते.

रामजीबाबा चालत आले होते. तिथपर्यंत वेळोबाच्या मंदिराला समांतर असा विस्तीर्ण दुधाचा समुद्र पसरला होता. रामजीबाबा वेड्यासारखे पाहात राहिले. पृथ्वीमातेला तर हा दुधाचा पान्हा फुटला की काय ? क्षणभर त्याला कळेना. सहज

त्याची नजर खाली गेली आणि दुसरे आश्चर्य ! त्या दुधाच्या समुद्राच्या काठाला प्रचंड पिठाची रास होती. पांढरे शुभ्र पीठ ! दुधाचा समुद ! रामजीबाबाला आनंद झाला. गावाचे दारिद्र्य आता संपले, अवर्षण संपले. दुष्काळाने म्लान झालेले लोकांचे चेहरे आता फुलणार होते. छोटी बाळे घुटूघुटू दूध पिऊन हसणार होती.

रामजीबाबा धावतच गावात आला. त्याने सर्व गावाला ही वार्ता सांगितली. लोकांचा प्रथम विश्वास बसेना, म्हणून चार लोक प्रथम पाहायला आले. त्या सर्वांनाच आश्चर्याने वेड लागायची पाळी आली. आणि हां हां म्हणता गावात वार्ता पसरली. सारा गाव लोटला ते नवल पाहायला. म्हातारे-कोतारे, तरुण–तरुणी, लहान मुले–मुली साऱ्यांची झिम्मड उडाली. रामजी, बाबा सर्वांना प्रेमाने सांगत होता–'बाबांनो, तुम्हाला पाहिजे तेवढेच न्या. साठा करू नका. पैशाच्या मोहाने कोणाला विकू नका.'

असे केलेत तर हे सर्व नाहीसे होईल, हे मात्र रामजीबाबाने कुणाला सांगितले नाही. त्याच्या मनात विचार आला. कोण उगाच अधाशीपणा करील ? दारात दुधाची गंगा नव्हे समुद्र वाहतोय. चुळकाभर दूध साठवण्याचा करंटेपणा कोण करील ? रामजीबाबा सज्जन माणूस. माणसाच्या मनाची दुसरी बाजू त्याच्या मनातच आली नाही.

सर्व लोक रामजीबाबाचा जयजयकार करीत त्याला धन्यवाद देत परतत होते. दिवसामागून दिवस जात होते. गावातील प्रत्येक घरची गृहिणी उठे, हातामध्ये गडवा व परात घेऊन

मंदिराच्या मागे जाई. गडवाभर दूध व पाहिजे तेवढे पीठ घेऊन येई व घरातल्या साऱ्यांना गरम गरम दशम्या वाढी.

रामजीबाबा लोकांना सांगत होता, 'देवाने आपल्याकडे कृपा-दृष्टी केली आहे. यंदा पाऊस पण पडेल बघा.' आणि खरोखरच त्या वर्षी खूप पाऊस पडला. शेती उत्तम पिकली. केळी, त्रिकू, पपनस यांनी फळझाडे ओथंबली. हरतऱ्हेच्या भाज्या झाल्या. रामजीबाबाने गावकऱ्यांच्या मदतीने वेळोबाचा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा केला. साऱ्या पंचक्रोशीत जेवणाची आमंत्रणे गेली. तांदुळाची खीर व गरम गरम दशमी असा महाप्रसाद ठरला. दुधाला कमी नाही. पिठाला कमी नाही. हजारोंनी माणसे जेवून गेली. गोरगरीब आशीर्वाद देऊन गेले.

दिवसामागून दिवस जात होते. एक दिवस गावातील भिकू व्यापाऱ्याच्या मनात पाप आले. त्याने मनाशी विचार केला, 'आपण चांगले १०।२० गाड्या पीठ व शंभर हंडे दूध शेजारी नेऊन विकत जावे. खूप पैसा मिळेल. चार पिढ्यांची ददात मिटेल. गुपचूप रात्री उरकावीत ही कामे.' रात्री सर्वच झोपतात. देवही झोपतच असेल असेही त्याला वाटले असावे. कोणाला दिसणार आपले कृत्य ? पापी माणसाचा विचार तो ! लगेच अंमलात येणारच ! चांगल्या विचारामागे चिंतन असते. त्याला अंमलात यायला पण म्हणून वेळ लागतो. भिकूच्या मनात हा पापी विचार आला मात्र, त्याला काही झोप येईना. तो लगबगीने उठला.

आपल्या नोकरांना घेऊन व सर्व सरंजामानिशी गाड्या, हंडे घेऊन तो मंदिरामागे गेला. त्याच्या सूचनेप्रमाणे नोकरांनी पिठाची पोती भरली. दुधाचे हंडे भरले. गाड्या गावाबाहेर चालू लागल्या.

दुसरा दिवस उजाडला. नित्याप्रमाणे घरच्या स्त्रिया हातात परात व दुधासाठी भांडे घेऊन गेल्या. पाहतात तो काय ! दुधाच्या समुद्राचा रंगच पालटला होता. त्यांनी खाली पाहिले तर पिठाच्या जागी पांढरी शुभ्र वाळू होती. हे काय घडले? सर्व पळतच गावात आल्या.

सर्व गावात वार्ता पसरली. रामजीबाबा व सर्व गावकरी मंदिराच्या मागे आले. रामजीबाबाने पाहिले. दुधाचा समुद्र नाहीसा झाला होता. तेथे दुधाच्या ऐवजी खारट पाणी होते. पिठाच्याऐवजी वाळू होती. संथ असणाऱ्या त्या दुधाच्या समुद्रामध्ये कसे शांत असायचे: पण आता तेथे प्रचंड लाटा निर्माण होत होत्या. आवाज होत होते. जणू परमेश्वराचे सहस्र हात धक्के देऊन गर्जना करीत होते, सांगत होते–'तुमच्यातला एक माणूस पापी निघाला. त्या मिठाच्या खड्याने सारा दुधाचा समुद्र नासला, खारट झाला.'

सर्वांना खूप वाईट वाटले. पण त्याला इलाज नव्हता. एकाच्या स्वार्थाचे व लोभाचे फळ असेच कधी कधी सर्वांना भोगायला लागते, त्याला काय करणार ?

* *

# पंचदीप

विद्यानगरच्या राजप्रांगणात आज एकच गर्दी उसळली होती. राजे उदयन सिंहासनाधिष्ठित झाले होते. त्यांच्या डाव्या हाताला मृगाजिनांच्या उंच व्यासपीठावर महा-आचार्य आदित्यमित्र बसले होते. समोरच्या भव्य प्रांगणात सुंदर शामियाना उभारला होता. ठिकठिकाणी लतापल्लव, आंब्याचे डहाळे, पताका यांनी सुशोभन केले होते. डाव्या हाताला खास राजदरबारातील मानकरी बसले होते. उजव्या हाताच्या कोपऱ्यालगत उंचावर भव्य असे व्यासपीठ होते. व त्यावर सात–आठ तेजस्वी मुद्रेचे युवक बसले होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर बुद्धीचे तेज होते. स्वत:बद्दल आत्मविश्वास होता. डोळ्यांमध्ये आव्हान स्वीकारल्याची चमक होती.

उजव्या बाजूला त्या व्यासपीठालगतच विद्यानगरमधील खास प्रतिष्ठित नागरिकांची बसण्याची सोय केलेली होती. व या सर्वांच्या समोर सर्व नागरिकांची बसण्याची सोय होती.

आज दीपोत्सवाचा– दिवाळीचा दुसरा दिवस, पाडव्याचा दिवस. वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी एक असा हा मंगल दिवस.

या दिवशी एक महत्त्वाचा निर्णय होणार होता. विद्यानगरमधील सर्व गुरुकुलांचे आचार्य- महाआचार्य आदित्यमित्र वृद्धापकाळा-मुळे आता निवृत्त होत होते. त्या जागेसाठी आज नवीन महा-आचार्यांची निवड होणार होती. या जागेसाठी योग्य व तेजस्वी व्यक्ती मिळणे आवश्यक होते. भावी विद्यार्थ्यांना प्रेरक ठरेल अशी शक्ती येथे आवश्यक होती. आदित्यमित्रांचा वचक, त्यांची बुद्धिमत्ता, विद्यार्थ्यांची पारख, ज्ञानोपासनेची जिवंत तळमळ- सर्वच काही आगळे होते. त्यांच्यासारखीच व्यक्ती या जागेसाठी लाभावी, अशीच विद्यानगरमधील प्रत्येक नागरिकाची मनोमनी इच्छा होती. ही निवड परंपरेप्रमाणे माजी महाआचार्यांनी करावयाची पद्धत होती. अर्थात आजची निवड ही त्याप्रमाणे महाआचार्य आदित्यमित्र यांनीच करावयाची. होती. त्यासाठीच विद्यानगर-मधील विविध गुरुकुलांमधून प्रतिनिधी आले होते. हे सर्वच प्रति-निधी छोटया गुरुकुलाचे आचार्य होते. कुणाचे गुरुकुल मोठे होते तर कुणाचे १०-१२ विद्यार्थी असतील एवढेच होते.

सारे नागरिक आता कुणाची निवड होते म्हणून औत्सुक्याने पाहात होते. महाआचार्य आदित्यमित्रांना राजे उदयन यांनी अभि-वादन करून या समारंभाला सुरुवात करण्यास विनंती केली. महाआचार्य आदित्यमित्र उठले व त्यांनी या जागेसाठी आलेल्या प्रत्येक प्रतिनिधीला आपली माहिती, आपल्या कल्पना सांगण्याची विनंती केली.

प्रथम आश्विनीकुलाचे आचार्य उठले व त्यांनी आपली माहिती सांगण्यास सुरुवात केली-

' महाराज, मी गेले पाच वर्षे हे कुल सांभाळीत आहे माझ्या गुरुकुलात २०० विद्यार्थी आज शिकत आहेत. मी सर्व न्यायशास्त्र,

नीतिशास्त्र, यांमध्ये पारंगत आहेच. एवढेच नव्हे तर अमरकोश, कठोपनिषद् असे अनेक ग्रंथ माझे मुखोद्गत आहे. माझी विद्वत्ता, बुद्धिमत्ता व एवढे मोठे गुरुकुल सांभाळण्याची माझी पात्रता लक्षात घेऊन महाआचार्य पदासाठी माझ्याशिवाय दुसरा योग्य माणूस नाही याची आपणाला खात्री पटेल.

एवढे बोलून आचार्य खाली बसले. स्वतःबद्दलचा फाजील आत्मविश्वास, आपल्या गुणांचे उद्धट दिग्दर्शन या गोष्टी पाहून लोकांमध्ये चुळबूळ निर्माण झाली. महाआचार्य मात्र सागरासारखे धीरगंभीर होते. त्यांच्या चेहऱ्यावर कोणतेच भाव नव्हते. त्यांनी संथपणे हात वर करून दुसऱ्या व्यक्तीला पाचारण केले.

भरणीकुलाचे आचार्य पुढे झाले व म्हणाले, ' महाराज, मला सांगायला अभिमान वाटतो, की माझ्या गुरुकुलात आज ३०० विद्यार्थी शिकत आहेत. आश्विनीकुलाच्या आचार्यांना जे वाटले, की माझेच गुरुकुल मोठे, हा त्यांचा अभिमान वृथा आहे. हे मी त्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो. मंडुकाला बाहेरचे जग कोठे दिसते ? त्याला वाटत असते, आपले तळे हेच सर्वांत मोठे. '

लोकांनी गलका सुरू केला–

' आपली माहिती सांगा, दुसऱ्याची निंदा नको. '

महाआचार्य आदित्यमित्र यांनी हात करताच सभा शांत झाली.

भरणीकुलाचे आचार्य पुढे बोलू लागले.

– ' न्याय, मीमांसा, व्याकरण, छंद, ज्योतिष या सर्व शास्त्रांत मी पारंगत आहेच. परंतु मी स्वतः काही रचना केली आहे. त्याच्यामध्ये जगाला सार्वकालिक ललामभूत होतील अशी सूत्रे मी रचली आहेत व या सूत्रांना माझे स्वतःचे नाव भास्कर असल्या-

मुळे ‘ भास्करोपनिषद् ’ असे नाव दिले आहे. त्या सूत्रांमधील काही सूत्रे मी आपणाला वाचून दाखवितो. ’

महाआचार्य आदित्यमित्र उभे राहिले, त्यांनी ‘ पुरे ’ असा हात केला. भास्कराच्या हातामधून ते ‘ भास्करोपनिषद् ’ काढून घेऊन आदित्यमित्र धीरगंभीर आवाजात म्हणाले– ‘ जगाला सार्वकालिक आनंददायी व चिरंतन सुखे देणारी सूत्रे निर्माण करणारी व्यक्ती ही वेगळी असते. स्वतःच्या बुद्धीचा, विद्वत्तेचा अहंकार असलेली व्यक्ती हे काम कितपत करू शकणार ? दुसऱ्याची निंदा करणाऱ्या वाणीला अशी सूत्रे पेलणारी नाहीत. दुसऱ्यावर प्रेम करणारी व्यक्तीच दुसऱ्याला आनंद देऊ शकते–’ आदित्यमित्रांचा आवाज कठोर झाला होता.

भरणीकुलाचे आचार्य खाली मान घालून जाग्यावर बसले. त्यानंतर कृत्तिका, रोहिणी वगैरे पाच-सहा कुलांचे आचार्य पुढे येऊन आपली महती पटविण्याचा प्रयत्न करून गेले. एकाच्याही मनात काही नवीन कल्पना, या सर्व गुरुकुलाच्या नियोजनासंबंधी काही सकस विचार नव्हते. एकच व्यक्ती अजून राहिलेली होती. महाआचार्यांनी अभिवादन करताच ती व्यक्ती पुढे आली. व्यासपीठावरून उतरून तिने आदित्यमित्राच्या चरणांला स्पर्श करून प्रथम वंदन केले. महाराजांना नमस्कार केला व सर्व लोकांना अभिवादन करून बोलण्यास सुरुवात केली–

‘–गुरुवर्य, महाराज, माझ्या नागरिक बंधु-भगिनींनो !’ माझे नाव विद्याधर. ’

सारी सभा तटस्थ झाली होती. इतर प्रतिनिधींपेक्षा ही व्यक्ती अगदीच वेगळी होती. विनयशील होती, परंतु लाचार

नव्हती. चेहऱ्यावर बुद्धीचे व आत्मविश्वासाचे तेज होते. सर्व नागरिक उत्सुकतेने ऐकू लागले. परंतु ती व्यक्ती बोलण्याच्या ऐवजी त्या व्यक्तीने काखेमधल्या झोळीमधून पाच दिवे काढले. व्यासपीठावर पाच ठिकाणी सारख्या अंतरावर ते दिवे त्याने ठेवले व आचार्यांना परत वंदन करून त्या व्यक्तीने पहिला दिवा प्रज्वलित करीत म्हटले–

'गुरुवर्य, हा श्रद्धेचा दीप. हा दीप माझ्या गुरुकुलामध्ये येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात मी प्रथम लावतो. माझे गुरुकुल फारच छोटे अवघे २० विद्यार्थ्यांचेच आहे. येणाऱ्या प्रत्येक विद्या. र्थ्यांच्या मनामध्ये हा श्रद्धेचा दीप प्रथम लावणेच मला आवश्यक वाटते. कारण जीवनात श्रद्धेला फार महत्त्व आहे. श्रद्धा असेल तरच पुढचा जीवनमार्ग उजळणार आहे. श्रद्धा ज्ञानावर हवी, स्वतःवर हवी, दुसऱ्यावर हवी, जगातील प्रत्येक चांगल्या गोष्टीवर श्रद्धा हवी. श्रद्धा ही पहिली पायरी आहे.

सारी सभा त्याची ही विलक्षण कृती व उक्ती तटस्थपणे पाहात होती. विद्याधरने पहिल्या दिव्याने दुसरा दिवा प्रज्वलित केला,–

'गुरुवर्य, हा दुसरा दीप आहे ज्ञानाचा. माझी श्रद्धा आहे की, श्रद्धेच्याच दीपाने हा ज्ञानाचा दीप खऱ्या अर्थाने प्रज्वलित होऊ शकतो.

विद्याधरने तिसरा दीप प्रज्वलित केला.

हा तिसरा दीप आहे सत्याचा. संपूर्ण ज्ञान झाल्यावरच खरे सत्य हे आकलन होणार आहे. हे सत्यच त्या परमेश्वरी शक्तीचा अंश आहे.'

विद्याधरने चौथा दीप प्रज्वलित केला.

हा चौथा दीप आहे शिव दीप. कल्याणाचा, मांगल्याचा दीप. सत्याच्या प्रकाशात चालले तरच मानवाला हा मांगल्याचा कल्याणाचा मार्ग सापडणार आहे. म्हणून हा चौथा दीप आहे 'शिवम्.'

विद्याधराने पाचवा दीप प्रज्वलित केला.

हा पाचवा दीप आहे सुंदरतेचा. 'सुंदरम्'चा. श्रद्धा, सत्य, ज्ञान आणि शिवं या चार दीपांच्या प्रकाशाच्या साहाय्याने आपण येणार आहोत या अंतिम सौंदर्याकडे या दीपांच्या प्रकाशात चालणारा माणूस शेवटी या सुंदर विश्वातच येईल. त्यालाही हे सर्व जग सुंदर भासेल, म्हणून हा पाचवा दीप 'सुंदरम'चा. 'सत्यं, शिवं, सुंदरम्' हे त्या परमेश्वराचे रूप आहे.'

सर्वांना पुन्हा एकदा वंदन करून विद्याधर आपल्या जागेवर जाऊन बसला. सर्व सभा निर्णय ऐकायला उत्सुक होती. किंबहुना सर्व सभेने आपल्या मनाशी निर्णय केलाच होता.

महाआचार्य आदित्यमित्र उभे राहिले–

'नागरिकहो, महाआचार्यपदासाठी मी विद्याधराची निवड करीत आहे. विद्या विनयेन शोभते । गुरू नम्र असेल तर विद्यार्थी तसे होतील.'

'श्रद्धा, ज्ञान, सत्यं, शिवं व सुंदरम् या पंचदीपाने विद्याधरने आपले जीवन उजळले आहे व तोच इतरांचे जीवनं उजळू शकेल अशी मला खात्री वाटते, म्हणून अत्यंत जबाबदारीचे सर्व राज्यातील विद्यादानाच्या सूत्राचे हे महाआचार्यपद मी विद्याधरला द्यावे अशी राजे उदयन् यांना शिफारस करतो.'

राजे उदयन् यांनी महामंत्र्यांना खूण करताच महामंत्र्यांनी एक पुष्पहार आदित्यमित्रांच्या हातात दिला.

आदित्यमित्रांनी मोठ्या विश्वासाने व प्रेमाने तो हार विद्याधराच्या गळ्यात घातला.

गळ्यातील हार काढून विद्याधरने आदित्यमित्रांना लवून नमस्कार केला.

' विद्याधर महाआचार्यपदाची ही जबाबदारी तू उत्तम तऱ्हेने सांभाळशील व यशस्वी होशील असा तुला आशीर्वाद आहे माझा. '

□ □

## सूर पृथ्वीवर आले

आकाशराणी अगदी कंटाळून गेली होती. तिची सात मुले भारी व्रात्य. सदा दंगा करीत असायची, ओरडत असायची. वस्तुत: प्रत्येकाचा आवाज इतका गोड होता की, ज्या वेळेला ही मुले क्वचित शांतपणे बोलायची हसायची तेव्हा आकाशराणी अगदी हरखून जायची. स्वत:च्या मुलांचे इतके मधुर आवाज ऐकून तृप्त व्हायची. म्हणायची, ' ही सात मुले जर अशीच मंद स्वरात बोलली तर जगाला वेड लावतील. '

आकाशराणी अनेक वेळा मुलांना समजून सांगायची. 'बाबांनो! जरा शांत राहा.' पण कुठचं काय अन् कुठचं काय ? छोटा षड्ज् व ऋषभ तर फार व्रात्य. दोघांची सारखी मारामारी चाललेली असायची आणि मग तारस्वरात ओरडणे. आकाशराणीच्या कान-ठळ्या बसून जायच्या. गंधार मध्यम आणि पंचम ही तिघे भावंडे जरा शांत होती खरी, परंतु थोरले धैवत, निषाद व षड्ज त्यांच्यावर दादागिरी चालवायचे आणि या सर्वांची भांडणे सोडवता सोडवता आकाशराणी मात्र अगदी थकून जायची छोटा षड्ज आणि सर्वात मोठा षड्ज इतके सारखे होते. सारख्याच वयाचे असते तर

कदाचित लोकांना वाटले असते, जुळे भाऊ आहेत की काय ? दोघांची अंगलट सारखी, उंची सारखी. परंतु एक सर्वात धाकटा तर एक सर्वात मोठा.

एक दिवस आकाशराणीच्या मनात आले, देवी सरस्वतीकडे या मुलांना घेऊन जावे. देवी सरस्वती हळुवार आहेत. त्या तरी मुलांना समजावून सांगतील.

झाले ! आकाशराणी आपल्या सर्व मुलांना घेऊन देवी सरस्वतीकडे आली. देवी सरस्वतीला आकाशराणीने सांगितले– ' देवीजी ! पाहा ना या मुलांकडे जरा. अहो, इतके सोन्यासारखे सुरेख सुरेल आवाज दिले आहेत देवाने प्रत्येकाला, पण त्याचे यांना काहीच नाही. नको तेवढे ताणून सारखी आरडा–ओरड चालू असते यांची. कोणाला कोठे बोलावे ! काय बोलावे यांचेही औचित्य नाही. मी अगदी भंडावून गेले आहे या मुलांनी. ' देवी सरस्वती हसून म्हणाली–

' आकाशराणी, तुम्ही आता जा घरी. मुले आता माझ्याकडे राहातील, तुम्ही काही काळजी करू नका त्यांची. '

आकाशराणी निश्चित मनाने घरी गेली. देवी सरस्वस्तीवर तिचा भारी विश्वास ' देवी सरस्वतीकडे म्हणजे अगदी योग्य ठिकाणी मुले आहेत. काही काळजी नको आता. '

देवी सरस्वतीकडे दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळीच निषाद आणि षड्जची चांगलीच जुंपली. अगदी गुद्दागुद्दी झाली. आरडा–ओरड सुरू–

देवी सरस्वती धावत आली. अरे अरे, निषाद, षड्ज्, इतक्या जोराने ओरडायचं होय सकाळच्या वेळी !

छोटा ऋषभ म्हणाला– देवीजी, तरी मी दादाला सांगत होतो

दुसऱ्याकडे असं वागायचं नाही, वेडी म्हणतील आपल्याला.'

ऋषभचा तो नाजूक कोमल आवाज ऐकून देवी सरस्वती म्हणाली, 'पाहिलेत शांतपणानें बोलले की तुमचे आवाज कसे सुदर आहेत? पण एकाच वेळी सर्वांनी दंगा केलात तर ऐकायला अगदी नको वाटतात.

'हो! आणि आज मी तुम्हाला एक गम्मत दाखवायला नेणार आहे.'

'कोणती गंमत? आम्ही येणार, आम्ही येणार.' सर्वांनी एकच गिल्ला केला.

देवी हसून म्हणाली– 'पण माझी अट आहे, जोराने किंचाळून बोलायचे नाही, सर्वांनी एकदम बोलायचे नाही.'

सर्वांनी मान हलवली.

'हं, आता मात्र सर्व शहाणी झालात हं.'

दुसऱ्या दिवशी देवी सरस्वती व सर्व मुले गेली वनामध्ये. नुकतीच सकाळ झाली होती. फुले उमलत होती. वातावरणात सुगंध दरवळत होता. आंब्यावर मोहोर आला होता. आणि एका आंब्याच्या उंच डहाळीवर बसून कोकिळा गात होती.

कुहू ऽऽ कुहू ऽऽ

पंचम आनंदाने ओरडला– 'देवीजी, हा तर अगदी माझ्यासारखाच आवाज– की माझाच आवाज?' देवी हसून म्हणाली– हो ना? पाहा संथपणाने बोलल्यावर किती गोड वाटतो आहे.'

इतक्यात वाऱ्याची झुळूक आली– साळीचे शेत जोराने स्ऽऽस्ऽऽ आवाज करत पूर्व दिशेला वळले. व परत छोटचाशा झुळकीने पश्चिमेकडे आले. आवाज होत होता स् ऽऽ स् ऽऽ पण आता अगदी मघापेक्षा मंद.

लहान षड्ज व मोठा षड्ज एकदम ओरडले, 'देवीजी, हे तर आमचेचआवाज, की– हं. हं. ऽऽ आपलं काय ठरलंय दोघांनी एकदम बोलायचं नाही म्हणून.' देवी हसून म्हणाली.

जवळच नदी वहात होती. खळ् ऽऽ खळ् ऽऽ सर्वांनी एकमेकांकडे पाहिले. त्यांना वाटले आपणा सर्वांचे आवाज त्यामधून एका पाठोपाठ येताहेत.

वेळूच्या वनामध्ये वेळूवर वेळू घासून आवाज येत होता– ध ऽ नी ऽ सा ऽ ऽ, ध ऽ नी ऽ सा ऽ ऽ

धैवंत व निषाद खूष झाले.

सर्व मुलांना घेऊन देवी सरस्वती घरी आली. त्यांना जवळ बोलावून घेऊन ती म्हणाली, पाहिलंत ? तुम्हा सर्वांच्या अंगी परमेश्वराने केवढे सामर्थ्य दिले आहे ! आजपासून तुम्ही सर्वांनी या माझ्या वीणेवर वसायचं. अगदी सूक्ष्म रूप घेऊन.'

'हो ऽ– आवडेल आम्हाला. आमच्या सर्वांच्या आवाजाची किमया कळली आता आम्हाला. तरीच आई सारखी म्हणायची या मुलांना कधी कळायचे त्यांचे सामर्थ्य ?

अशा प्रकारे देवी सरस्वतीच्या वीणेवर वसून ही सर्व मुले एक दिवस पृथ्वीवर आली. लोक त्यांना आता त्यांच्या सुरेल आवाजाने सूर म्हणूनच ओळखू लागली–

सा ऽ रे ऽ ग ऽ म ऽ प ऽ ध ऽ नी ऽ सा ऽ ऽ

म. ग्रं. सं. ठाणे, बाल वाङ्मय विभाग.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९९२ दिनांक ३७/३/९७
विषय ...बा.वा. ... क्र.
BVBK-0402962